137

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग

# मत्स्यव्यवसाय योजनेंतर्गत योजनांचे मूल्यमापन


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१.



१९९६

# प्रस्तावना

१. मत्स्यव्यवसाय फार पुरातन काळापासून आस्तित्वात आहे. महाराष्ट्र राज्यात या व्यवसायामध्ये सुमारे ५ लक्ष प्रत्यक्षपणे व १० लक्ष लोक अप्रत्यक्षपणे कार्यरत आहेत. राज्याच्या एकंदरीत उत्पादनात मासळी उत्पादनामुळे मोलाची भर पडते. तसेच मासळी तथा तत्सम पदार्थ निर्यातीमुळे राज्याला परकीय चलनही मिळते. अशाप्रकारे उपजिविकेचे महत्वाचे साधन म्हणून महाराष्ट्रात इतर व्यवसायाबरोबरच मत्स्यव्यवसाय हा देखील महत्वाचा व्यवसाय म्हणून ओळखला जातो.

२. महाराष्ट्रात सागरी मच्छिमारी करणाऱ्यामध्ये प्रामुख्याने भोई, कोळी कहार, ढिवर या पारंपारिक मच्छिमारांचाचेच प्रमाण जास्त आहे. त्यामानाने आदिवासी लोकांचे या व्यवसायातील प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. तसेच राज्यातील अंतर्गत भागातील जिल्हयातील आदिवासी मच्छिमारांपैकी बरेचजण हा व्यवसाय अधिक उत्पन्नाच्या दृष्टीने पूर्णवेळ न करता घरगुती वापराच्या दृष्टीने करतात.

३. समाजातील दुर्बल घटकांच्या (विशेषत: आदिवासींचे) आर्थिक व सर्वांगीण विकासासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. निरनिराळ्या व्यवसायाप्रमाणेच उत्पन्नात भर घालण्यासाठी मत्स्यव्यवसायाकडे या दुर्बल घटकातील लोकांनी (विशेषत: आदिवासींनी) व्यापारी दृष्टीकोनातून स्वत:च्या आर्थिक विकासासाठी मत्स्यव्यवसाय योजनांतर्गत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, अशी शासनाची धारणा आहे.

४. सागरी, 'निमखारे पाणी तसेच भूजलाशयीन मत्स्योत्पादनात वाढ करणे व मच्छिमारांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणे हे मत्स्यव्यवसाय विकासाचे मुख्य उदिष्ट्य आहे. मत्स्यव्यवसायातील आदिवासींचा सहभाग, मत्स्यव्यवसायाच्या विविध योजना व त्या राबविण्याच्या पध्दती, त्यातील अडचणी व त्यावरील उपाय योजना, मत्स्योत्पादनापासून मिळणारे उत्पन्न, मत्स्यव्यवसाय वाढविण्यात असलेला वाव, इत्यादी बाबींचा उहापोह प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालामध्ये करण्यात आला आहे.

५. प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालामध्ये ठाणे जिल्हयातील मच्छिमार सहकारी संस्थांच्या माध्यमातून लाभ घेतलेल्या लाभार्थींना प्रत्यक्ष भेटी देण्यात आल्या. मत्स्यव्यवसाय योजनामुळे त्यांना झालेले दृष्य परिणाम प्रस्तुत मूल्यमापन अहवालात अजमावण्यात आलेले आहेत.

६. सदर मूल्यमापन अहवाल तयार करण्याची जबाबदारी या संस्थेतील श्री. एन. बी. कांबळे, संशोधन सहाय्यक यांचेवर सोपविण्यात आलेली होती. श्री. एस. आर. साळुंके, संशोधन सहाय्यक यांनी सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी श्री. कांबळे यांना सहकार्य केले. सौ. मंगला घोडे, संशोधन अधिकारी यांनी श्री. कांबळे यांना मूल्यमापन अहवालाचे प्रारुप लिहिण्यास मदत केली. श्री. डी. एम. रासकर, उपसंचालक

यांनी मूल्यमापन अहवालाचे प्रारुप तपासून त्यात योग्य त्या दुरुस्त्या केल्या .

मत्स्यव्यवसाय योजनांची माहिती पुरविण्यासाठी ठाणे जिल्हयातील सहाय्यक मत्स्य व्यवसाय संचालक, पालघर, तसेच डहाणू, शहापूर , पालघर येथील मच्छिमार सहकारी संस्थांनाही चांगले सहकार्य केलेले आहे. मूल्यमापन अहवालाचे टंकलेखनाचे व डी.टी.पी.चे काम श्री.के.पी.कुर्डे, लघुटंकलेखक यांनी केले.

७. प्रस्तुत मूल्यमापन अहवाल मत्स्यव्यवसाय विभाग व मत्स्यव्यवसायाशी निगडीत असणाऱ्या इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, त्याचप्रमाणे आदिवासी विकास विभागात काम करणारे प्रकल्प अधिकारी व कर्मचारी तसेच आदिवासी विकासासाठी झटणाऱ्या व संशोधन करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांनाही प्रस्तुत मूल्यमापन अहवाल उपयुक्त होईल, असे वाटते.

पुणे

दिनांक-

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | प्रकरण क्रमांक | | विषय | पृष्ठक्रमांक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत |
| १. | प्रकरण १ ले | | प्रास्ताविक माहिती | ४ | ८ |
| २. | प्रकरण २ रे | | मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या महत्वाच्या योजनांची माहिती व कार्यपध्दतीचे विश्लेषण | ९ | १३ |
| ३. | प्रकरण ३ रे | | मूल्यमापन अहवालाची उदिष्टये, कायपध्दती व व्याप्ती | १४ | १७ |
| ४. | प्रकरण ४ थे | | पाहणीतील सांख्यिकी माहितीचे पृथ:करण | १८ | २४ |
| ५. | प्रकरण ५ वे | | मूल्यमापन अहवालातील निरीक्षणात्मक बाबी | २५ | २९ |
| ६. | प्रकरण ६ वे | | सूचना तथा शिफारशी | ३० | ३४ |
| ७. | प्रपत्रे | १. | लाभधारकाची माहिती | ३५ | ३६ |
| | | २. | योजना राबविणाऱ्या यंत्रणेकरिता | ३७ | ३९ |
| | | ३. | बँका/वित्तीय संस्था यांची माहिती | ४० | ४१ |

# प्रकरण क्र. १

## प्रास्ताविक माहिती

१. महाराष्ट्राची लोकसंख्या व व्यवसाय

सन १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ७,८९,३७,१७१ इतकी असून त्यापैकी आदिवासी लोकसंख्या ७३,१८,२८३ इतकी आहे. राज्यातील आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ९.२७ इतके आहे. महाराष्ट्र राज्यात निरनिराळया प्रकारचे एकूण ४७ अनुसूचित जमाती असून त्यापैकी १४ जमाती मुख्य आहेत. त्यापैकी कातकरी, कोलाम व माडिया गोंड हया तीन अत्यंत मागासलेल्या आदिम जमाती आहेत.

महाराष्ट्रात बहुतांश लोक हे शेतीवरच अवलंबून आहेत. आदिवासी देखील त्याला अपवाद नाहीत. नोकरी, उद्योगधंदा, अंशकालीन कामगार, वने इ.क्षेत्रात आदिवासी काम करतात. तथापि, त्यांचे प्रमाण अगदी अल्प आहे. आदिवासींचा शेती हाच मुख्य व्यवसाय असून तो पारंपारिक पध्दतीने केला जातो. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, सुधारीत बि-बियाणे, खते, प्रगत अवजारे इत्यादींचा अभाव असतो. त्यामुळे तुलनेने आदिवासी लोकांचे शेती उत्पन्न तुटपुंजे असते.

२. केवळ आदिवासीबद्दल बोलावयाचे झाल्यास, आदिवासी समाज प्रामुख्याने दुर्गम भागात वास्तव्य करणारा आहे. बहुतांश आदिवासी लोकांकडे अल्प अगर अत्यल्प जमिनी आहेत. एवढेच नव्हे तर त्यांच्या शेत जमिनीची प्रत देखील चांगली नसते. शेत जमिनी उंचसखल असल्याने पावसाळयात त्यांच्या जमिनीची धूप जास्त होते व मूळातच हलका दर्जा असलेल्या जमिनीचा दर्जा अधिकच खालावला जातो. तशातच पाऊस फार कमी अथवा फार जास्त झाल्यास आदिवासी शेतकरी दारिद्रयाच्या खाईत लोटला जातो. जलसिंचनाच्या सोयी फारश्या उपलब्ध नसल्याने बऱ्याच भागात वर्षातून फक्त एकच पीक घेतले जाते. अशाप्रकारे केवळ पावसावर अवलंबून असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांची स्थिती फार शोचनीय असते. ते आपल्या तुटपुंज्या उत्पन्नात वाढ करु शकत नाहीत. अल्प व अत्यल्प भूधारकांना केवळ शेतीवर आपल्या कुटुंबाची उपजिविका करणे फार कठीण जाते. त्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी जोडधंदा असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत शेतीला पूरक ठरणाऱ्या व्यवसायाची आवश्यकता असते.

३. दुग्ध व्यवसाय , कुक्कुटपालन, शेळीपालन, मधुमक्षिका पालन इत्यादी व्यवसायाप्रमाणे मत्स्यव्यवसाय हा देखील शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ओळखला जातो. समुद्र किनाऱ्यावर व अंतर्गत भागात राहणाऱ्या कोळी, भोई, ढिवर इ.मागासलेल्या जमातींचा मासळी पकडणे हा पारंपारिक व्यवसाय

आहे. तथापि, शेती व्यवसाय करणाऱ्यांकडून व आदिवासींकडून मत्स्यव्यवसायाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. समुद्र किनारा नसलेल्या जिल्हयांमध्ये आदिवासी लोकांचा मच्छिमारी व्यवसाय हा केवळ अर्धवेळ (Part-Time) असतो. पकडलेल्या मासळीतून स्वत:ची गरज भागवून शिल्लक राहिलेली मासळी ते बाजारात विकतात. शिवाय त्यांची मच्छिमारीची पध्दत फार जुनी आहे. (उदा. कापडाच्या सहाय्याने मच्छिमारी करणे.) किनाऱ्यालगतच्या तसेच अंतर्गत जलाशयीन भागातील लोकांनी मासेमारी अगर मत्स्यशेती करुन आपले उत्पन्न वाढवावे व आर्थिक प्रगती करावी, यासाठी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत विविध योजना शासन राबवित आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाची प्रमुख उदिष्टये पुढीलप्रमाणे आहेत-

(१) उपलब्ध जलसंपत्तीतून अधिकाधिक मत्स्योत्पादन काढण्यास प्रोत्साहन व आर्थिक सहाय्य देणे.

(२) मच्छिमार वर्ग आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेला असल्यामुळे या वर्गाची आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे.

(३) मच्छिमारांना व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता विकसित करणे.

४. मानवाच्या जीवनामध्ये आहाराचे महत्व :-

आहाराचे मुख्य दोन प्रकार आहेत. १. शाकाहार २. मांसाहार- शरीराच्या निकोप वाढीसाठी आहारात आवश्यक असणाऱ्या निरनिराळया जीवनसत्वाबरोबरच प्रथिनेसुध्दा आहारात असणे आवश्यक आहे. मासळीमध्ये प्रथिनांचे प्रमाण भरपूर असल्याने प्राणिजन्य प्रथिनयुक्त सकस आहार पुरविण्यात मासळीचा वाटा मोठा व महत्वाचा आहे. म्हणून मत्स्यव्यवसायाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. सागरी, निमखारे पाणी व गोड्या पाण्यातील अशा तीन प्रकारच्या पाण्यामध्ये मत्स्यव्यवसाय केला जातो.

५. महाराष्ट्रात ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे चार सागरी जिल्हे असून राज्याला ७२० कि.मी.लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. या समुद्र किनाऱ्यावर माशांनी समृध्द असा ८७,००० चौ.कि.मी.क्षेत्रफळाचा पट्टा आहे. निमखाऱ्या पाण्याचे क्षेत्र १४,५०० हेक्टर इतके असून लहान मोठी तळी, तलाव व पाटबंधारे यांच्या स्वरुपात सुमारे ३ लक्ष हेक्टर भूजल क्षेत्र उपलब्ध आहे.

राज्यातील आदिवासी क्षेत्रात भूजल मत्स्यव्यवसाय नदी. नाले, डोंगरातील प्रवाह इत्यादीमधून केला जातो. आदिवासी क्षेत्रात मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प घेण्यात आल्यामुळे मोठ्या संख्येने जलाशये निर्माण झाली आहेत. मत्स्यव्यवसाय विकासासाठी आदिवासी क्षेत्रात जलाशय व तलावाच्या रुपाने सुमारे ३७,६०० हेक्टर जलस्तर उपलब्ध आहे. गेल्या काही वर्षात मत्स्यव्यवसाय विभागाने तळी व जलाशयामध्ये मच्छिमारी करण्याच्या नवीन पध्दती अवलंबिल्यामुळे मच्छिमारांना मत्स्योत्पादन

करण्यासाठी व उपजिविकेसाठी मानवनिर्मित जलाशयांचा उपयोग होऊ लागला आहे.

६. मत्स्यव्यवसाय विभागाच्या कार्याचे ढोबळमानाने खालीलप्रमाणे आठ प्रकारात वर्गीकरण करण्यात येते.

(१) संचालन व प्रशासन

(२) भूजल मत्स्यव्यवसाय

(३) सागरी मत्स्यव्यवसाय

(४) निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय

(५) शिक्षण व प्रशिक्षण

(६) मासळीची प्रक्रीया, जतन व पणन

(७) संशोधन

(८) इतर कार्यक्रम

भूजल मत्स्यव्यवसाय:-

गोड्या पाण्याची लहान तळी, तलाव व जलाशय याप्रकारचे सुमारे ३ लक्ष हेक्टर जलक्षेत्र राज्यात उपलब्ध असून त्याचा योग्य वापर करुन त्यातून मत्स्योत्पादन घेण्याच्या योजना या कार्यक्रमांतर्गत कार्यरत आहेत. तलावात व जलाशयात जादा वाढणारे मत्स्यबीज सोडून मासळी, विक्रीयोग्य आकारापर्यंत वाढविण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत तलावात मत्स्यशेती करण्यासाठी सहकारी संस्थांना प्राधान्य व प्रोत्साहन देण्यात येते.

सागरी मत्स्यव्यवसाय-

लहान लहान मच्छिमारी बंदरे बांधून मासळी उतरविण्याच्या व नौकानयनाच्या मूलभूत सुविधा पुरविण्याचा कार्यक्रम केंद्र शासनाच्या पध्दतीने हाती घेण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेली सागरी मत्स्यसंपत्ती मिळविण्यासाठी यांत्रिकी नौका बांधण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमाच्या मदतीने सहकारी संस्थांना अर्थसहाय्य दिले जाते.

### निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय

खाड्याकाठच्या व इतर खाजण जमिनीपैकी १० हजार हेक्टर जमीन निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यशेतीसाठी उपयुक्त असल्याचे अंदाजित करण्यात आले आहे. निमखाऱ्या पाण्यात कोळंबी व मासळी यांची शेती करुन त्यांच्या उत्पादनात वाढ करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

### शिक्षण व प्रशिक्षण

मच्छिमार समाजातील मुलांना शालेय शिक्षण व युवकांना व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी हा कार्यक्रम आहे.

### मासळी प्रक्रीया व पणन

मासळी हा माल नाशवंत असल्याने तिच्या सुरक्षण, वाहतूक व विक्रीसाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या मदतीने बर्फ, कारखाने, शीतगृहे बांधणे, मालमोटारी खरेदी करणे तसेच गोदामे बांधणे इत्यादीसाठी सहकारी संस्थांना कर्ज, भागभांडवल व अनुदान या स्वरुपात अर्थसहाय्य दिले जाते.

### संशोधन

हा कार्यक्रम कृषी विद्यापीठाकडून हाताळला जातो. त्यासाठी लागणारे सहाय्य अनुदान शासनाकडून दिले जाते.

### प्रशासन

मत्स्यव्यवसाय आयुक्त हे मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रमुख असून ते विभागाध्यक्ष म्हणून काम पाहतात. त्यांचेकडे राज्यातील सर्वसाधारण मत्स्यव्यवसाय योजनेबरोबरच आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या जनजाती क्षेत्रातील मत्स्यव्यवसाय योजनांचेही काम आहे. राज्य पातळीवर आयुक्तांना सहाय्य करण्यासाठी उपसंचालक (सागरी), उपसंचालक (भूजल), उपसंचालक (निमखारे पाणी) व सहाय्यक संचालक (प्रशासन) हे अधिकारी आहेत. प्रादेशिक पातळीवर मत्स्यव्यवसाय उपसंचालक आहेत. जिल्हा पातळीवर मत्स्यव्यवसायाचे काम पाहण्यासाठी जिल्हा मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. भंडारा, चंद्रपूर जिल्हयासाठी कामाचा व्याप लक्षात घेऊन प्रत्येकी जादा एक सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक व एक मत्स्यव्यवसाय अधिकारी नेमण्यात आलेला आहे. वरील अधिकाऱ्यांच्या मदतीला विविध श्रेणीतील तांत्रिक व तांत्रिकेतर अराजपत्रित कर्मचारी असतात. सहकारी संस्थांच्या कामासाठी उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्यव्यवसाय), सांख्यिकी कामासाठी उपसंचालक (सांख्यिकी), व सांख्यिकी अधिकारी, लेखाविषयक कामासाठी लेखाधिकारी

इत्यादी अधिकारीही त्या त्या विभागाकडून प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेले आहेत.

## सांख्यिकी विभाग

मत्स्य-व्यवसाय उद्योगाच्या विविध बाजूसंबंधीची आकडेवारी गोळा करणे व उद्योगाच्या माहितीसाठी सागरी मासळीच्या उत्पादनाचे विश्वसनीय अंदाज काढणे हे सांख्यिकी विभागाचे मुख्य काम आहे. या विभागाद्वारे मासळीचे भाव, मासळी व मासळीच्या पदार्थांची निर्यात, बर्फकारखाने व शीतगृहे तसेच पकडलेल्या मासळीचा उपयोग, मच्छिमारांची संख्या, होड्या, जाळी इ. संबंधीची आकडेवारी ठेवण्यात येते.

## कायद्यातील तरतूद

निरनिराळ्या प्रकारच्या व आकारमानाच्या मासेमारी नौकांचे कार्यक्षेत्र निश्चित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र सागरी मासेमारी नियम, अधिनियम १९८१' हा कायदा सप्टेंबर, १९८१ मध्ये संमत केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक ४.८.१९९२ पासून सुरु आहे. या अधिनियमातील प्रमुख तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

१. मासेमारी नौकांची नोंदणी करणे.

२. मासेमारीसाठी परवाना देणे

३. कार्यक्षेत्र ठरविण्याबाबत शिफारशी करण्यासाठी जिल्हावार समित्यांची स्थापना करणे.

४. जिल्हावार समित्यांच्या शिफारशीवर विचार करुन कार्यक्षेत्राबाबत आदेश देणे.

५. कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा करणे.

६. अपिल मंडळाची स्थापना व अपिलांचे पुनर्निरीक्षण इ.

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राज्यात ज्या विविध योजना राबविल्या जातात, त्याची माहिती पुढील प्रकरणात दिली आहे.

# प्रकरण क्र. २

## मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या महत्वाच्या योजनांची माहिती व कार्यपध्दतीचे विश्लेषण

मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत खालील महत्वाच्या योजना राबविल्या जातात.

### २.१ अवरुध्द पाण्यात मत्स्यसंवर्धन करणे

अवरुध्द पाण्यातील मत्स्यसंवर्धन ही योजना पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आरंभापासून चालू आहे. संवर्धनास योग्य असलेल्या जलक्षेत्रात मत्स्यशेती करुन गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन वाढविणे हा या योजनेचा हेतू आहे. दरवर्षी मत्स्यव्यवसाय विभागाकडून जलद वाढणाऱ्या जातीचे मत्स्यबीज स्थानिकरित्या निर्माण केले जाते व ते संवर्धकांना अल्पदराने पुरविण्यात येऊन तलाव/जलाशये यामध्ये मत्स्यशेती करण्यास प्रोत्साहित करण्यात येते.

या योजने अंतर्गत पाटबंधारे विभागाच्या तलावात त्याचप्रमाणे नद्या व जलाशये यामध्ये प्रथम खात्यामार्फत मत्स्यबीज संचयन केले जाते. पूर्वी संवर्धनायोग्य अशा जलद वाढीच्या 'कार्प' माशांची पिल्ले पश्चिम बंगालमधून आयात केली जात होती. परतू १९९१-९२ या वर्षापासून आयात मत्स्यबीजांचा पुरवठा बंद करण्यात येऊन स्थानिकरित्या प्रमुख 'कार्प' माशांचे उत्पादन सुरु करण्यात आले आहे. सन १९९१-९२ यावर्षी ३२ कोटी मत्स्यबीजांची स्थानिकरित्या निर्मिती करुन मच्छिमारांना किफायतशीर दराने पुरवठा करण्यात आला.

मत्स्यसंवर्धनास योग्य असलेल्या जलक्षेत्रात योग्य प्रमाणात साठवणूक करण्यास प्रतिवर्षी राज्यात ६० कोटी मत्स्यबीजांची आवश्यकता आहे. मत्स्यबीजांची ही गरज भागविण्याकरिता राज्यात ३५ मत्स्यबीज केंद्रे कार्यरत करण्यात आली असून त्यापैकी २९ हॅचरींचे काम १९९२-९३ या वर्षात ५० टक्के पूर्ण झालेले आहे. या २९ हॅचरीमधून १९९२-९३ ची मत्स्यबीजांची मागणी पूर्ण भागवून राज्य मत्स्यबीज संचयनाचे दृष्टीने स्वयंपूर्ण झाले आहे.

### २.२ मासेमारी बंदराची सुधारणा व मासळी उतरविण्याच्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करणे-

मासळी ही त्वरीत नाशवंत असल्याने ती बोटीमधून ताबडतोब उतरवून घेणे आवश्यक असते. त्याकरिता 'मासेमार बंदराची सुधारणा' ही योजना १९८५-८६ पासून कार्यान्वित झालेली आहे. या योजनेनुसार सागरकिनारी मासेमारीसाठी परिपूर्ण अशी बंदरे बांधणे, बंदरातील खडक फोडणे, बंदरात

दिव्यांची सोय करणे, तसेच बोटीतून मासळी उतरविण्यासाठी धक्का बांधणे, इ.आवश्यक कामे हाती घेतली जातात. ही योजना बंदर विभागामार्फत कार्यान्वित केली जाते. सदर कामावरील खर्च राज्य शासन व केंद्र शासन यांच्यामध्ये ५०:५० याप्रमाणे विभागून घेतला जातो.

### २.३ मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण आणि मच्छिमार नौकांमध्ये सुधारणा

सागरसंपत्ती विपुल प्रमाणात मिळविण्यासाठी 'मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण' हा कार्यक्रम सर्वाधिक महत्वाचा आहे. सन १९७७-७८ या वर्षापासून 'मासेमारी नौकांचे यांत्रिकीकरण 'या योजनेची राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या अर्थसहाय्याच्या पध्दतीने अंमलबजावणी सुरु झाली आहे.

वैयक्तिक मच्छिमार अथवा त्यांचे गटास राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँक अथवा शासनमान्य अधिकृत वित्त संस्था, महामंडळ यापैकी कोणाकडूनही अर्थसहाय्य घेऊन विभागाच्या परवानगीने नौका बांधल्यास वा तयार नौका खरेदी केल्यास, या योजनेसाठी २५ टक्के अनुदान दिले जाते. तसेच आऊटबोर्ड इंजिन खरेदीवर मच्छिमारांना ५० टक्के अनुदान देण्यात येते. त्यात केंद्र व राज्य शासन यांचा निम्मा निम्मा हिस्सा असतो. उर्वरित ५० टक्के रक्कम संबंधितांना स्वत: उभी करावी लागते.

### २.४ मच्छिमारांना प्रशिक्षण

या योजनेंतर्गत भूजल विभागातील मासेमारांना मासेमारीचे प्रगत ज्ञान व्हावे, म्हणून मत्स्यव्यवसाय विभागातर्फे राज्यातील रायगड, पुणे, अहमदनगर, परभणी, नांदेड व भंडारा या जिल्हयातील मत्स्यबीज उत्पादन केंद्रातून एक महिन्याचे 'लघु प्रशिक्षण ' दिले जाते. अशी दोन प्रशिक्षण सत्रे प्रतिवर्षी माशांच्य प्रजनन काळात घेतली जातात. प्रशिक्षणार्थींना प्रत्येकी २००/- रु. विद्यावेतन व जाण्या-येण्याचा खर्च दिला जातो.

तसेच नौकेवरील इंजिनची निगा कशी राखावी व जादा मत्स्योत्पादन कोणत्या पध्दतीने करावे यासाठी मच्छिमार युवकांना प्रशिक्षण देण्यात येते. वसई, अलिबाग, रत्नागिरी, मालवण इ.ठिकाणी वर्षातून दोन सत्रात सहा महिन्यांच्या कालावधीत हे प्रशिक्षण दिले जाते. दरवर्षी सुमारे २६४ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येते.

प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या व अनुभवी मच्छिमार युवकांना मच्छिमारातील प्रगत प्रशिक्षणासाठी राज्याबाहेरील चिनहर (लखनौ, उत्तर प्रदेश) व कोचीन (केरळ) येथील 'अखिल भारतीय मत्स्य प्रशिक्षण' संस्थामध्ये पाठविण्यात येते.

ठाणे, रायगड, यवतमाळ व गडचिरोली या जिल्हयातील आदिम जमातीतील मच्छिमारांना प्रशिक्षण देण्यासाठी या योजनांतर्गत 'विशेष केंद्रीय सहाय्य ' मिळते.

## २.५ मच्छिमार साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय्य

या योजनेखाली आर्थिकदृष्ट्या कमकुवत व दुर्बल असलेल्या मच्छिमारांना तसेच अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना मच्छिमारीची आधुनिक साधने वापरुन मासेमारी करण्यासाठी म्हणून नॉयलॉन/सूत, जाळी, डिझेल, बिगर यांत्रिकी नौका इत्यादी साधनांच्या खरेदीवर ५० टक्के अनुदानाच्या स्वरुपात आर्थिक सहाय्य देण्यात येते. प्रत्येक पात्र मच्छिमारास वार्षिक ५ किलो नायलॉन सूत देण्याची मर्यादा आहे.

## २.६ हायस्पीड डिझेल तेलावरील अबकारी करातील सूट :-

२० मीटरपेक्षा कमी लांबीच्या यांत्रिकी मच्छिमार नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावरील केंद्रीय उत्पादन शुल्काची (अबकारी कर) प्रतिपूर्ती देण्याची योजना केंद्र शासनाने १९९०-९१ पासून मंजूर केलेली आहे. या योजनेखाली प्रथमवर्षी केंद्र शासनाकडून अर्थ सहाय्यावरील खर्चाच्या १०० टक्के अनुदान उपलब्ध झाले. परंतू सन १९९१-९२ पासून केंद्र शासनाने अर्थसहाय्य देण्याच्या पध्दतीत बदल केल्याने, सध्या ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेखाली मच्छिमारांना ३५१.७५ रुपये प्रतिकिलो लिटर या दराने उत्पादन शुल्काची प्रतिपूर्ती सूट दिली जाते.

## २.७ निमखाऱ्या पाण्याच्या क्षेत्राचे सर्वेक्षण

निमखाऱ्या पाण्यातून उत्पादित होणारे कोळंबीचे मत्स्योत्पादन सध्या फारच अल्प प्रमाणात आहे. हे मत्स्योत्पादन पारंपारिक पध्दतीने करण्यात येणाऱ्या मासेमारीपासून होते. निमखाऱ्या जलक्षेत्राचा मत्स्यशेतीसाठी वापर करता येणे शक्य आहे. मत्स्यव्यवसाय विभागाने राज्याच्या सागरी जिल्हयातील ७० लहान मोठ्या खाड्यांचे प्राथमिक सर्वेक्षण केले आहे. जवळ जवळ १०,००० हेक्टर एवढे क्षेत्र मत्स्यसंवर्धनासाठी उपयोगी पडेल, असा अंदाज आहे.

## २.८ निमखारे पाणी मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा

निमखारे पाण्यातील कोळंबी संवर्धनासाठी आधुनिक तांत्रिक ज्ञानाचा वापर व त्यासाठी आवश्यक त्या सर्व साधनसामुग्रीचा पुरवठा करुन कोळंबी मत्स्योत्पादन वाढविणे या उद्देशाने राज्यातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा कार्यान्वित आहे.

सदर योजनेअंतर्गत मत्स्य कास्तकारांना जागेची निवड करण्यापासून ते पीक काढेपर्यंत तसेच कोळंबी विक्रीपर्यंतचे संपूर्ण तांत्रिक व इतर बाबतीत सहाय्य करण्यात येते. विस्तार सेवा, मत्स्य विकासासंबंधी नवीन तंत्रज्ञानाबाबतची माहिती मत्स्यकास्तकारांना देणे तसेच त्यांना प्रशिक्षण देणे इत्यादी

कामे या यंत्रणेकडून करण्यात येतात. या यंत्रणेची प्रमुख उदिष्टये खालीलप्रमाणे आहेत-

१. आस्तित्वात असलेल्या खाजन जागांचा विकास करुन त्या निमखारे पाणी मत्स्य संवर्धनाखाली आणणे व कोळंबीच्या निर्यातीपासून परकीय चलन मिळविणे.

२. ग्रामीण भागात राहणाऱ्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांचा आर्थिक विकास करणे.

३. अत्यंत कमी रोजगार उपलब्ध होणाऱ्या क्षेत्रातील लोकांचे जीवन आर्थिकदृष्टया विकसित करणे.

४. मत्स्यकास्तकारांना निमखाऱ्या पाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी तळी विकसित करण्याच्या दृष्टीने बँकेकडून कर्ज मिळवून देणे. तसेच केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारे ५० :५० टक्के अनुदान मिळवून देणे इ.कामे सदर योजनेमार्फत करण्यात येतात.

ही योजना केंद्र पुरस्कृत असून या योजनेनुसार भांडवली खर्च व प्रथम पीक घेण्यासाठी प्रती हेक्टरी येणारा आवर्ती खर्च यासाठी २५ टक्के परंतू जास्तीत जास्त रु.३०,०००/- पर्यंत अनुदान देय आहे. अनुदानासाठी येणारा खर्च केंद्र शासन व राज्य शासन यांनी निम्मा निम्मा असा करावयाचा आहे व उर्वरित ७५ टक्के खर्चाची रक्कम लाभार्थ्याने स्वत: उभी करावयाची असते.

## २.९ निमखाऱ्या पाण्यातील मच्छिविकास

केंद्र शासनाच्या 'एकात्मिक निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास' या कार्यक्रमांतर्गत राज्यातील निमखारे पाणी क्षेत्राचे सुक्ष्मतम सर्वेक्षण करण्याच्या दृष्टीने तांत्रिक व अभियांत्रिकी कर्मचारी वर्गाचे पथक निर्माण करण्यात आले असून या योजनेसाठी केंद्राचे ५० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. निमखारे पाणी क्षेत्राचे सुक्ष्मतम सर्वेक्षण करतांना खाडीच्या पाण्याची भरती ओहोटीची उंची, पाण्याची आम्लता, क्षारता व त्यातील विदान्य, प्राणवायू इ.बाबींचा सखोल अभ्यास करण्यात येऊन कोळंबी संवर्धनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे क्षेत्र विकसित करण्याच्या दृष्टीने सदर जागेचे अभियांत्रिकी नकाशे व आराखडे कोळंबी संवर्धकांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

## २.१० मच्छिमार सहकारी संस्थांचा विकास

मच्छिमार सहकारी संस्थांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्या आर्थिक स्थितीत बळकटी आणणे आवश्यक आहे. म्हणून या योजनेतून मच्छिमार सहकारी संस्थांना पहिली पाच वर्षे व्यवस्थापकीय अनुदान व भागभांडवल अंशदान देण्यात येते.

या योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाते.

१. समुह पुरस्कृत प्राथमिक मच्छिमार संस्थांना रुपये ५,०००/- (उतरत्या क्रमाने)

२. समूह पुरस्कृत नसलेल्या प्राथमिक सहकारी संस्थांना रु.१,८००/-(उतरत्या क्रमाने)

३. भूजलाशयीन क्षेत्रातील प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्थांना एकूण २,०००/- रु.अनुदान (उतरत्या क्रमाने)

४. सहकारी संस्थांना स्वतःच्या भागभांडवलाच्या तिपटीएवढे परंतू जास्तीत जास्त रु.१०,०००/- इतके भागभांडवल

५. जिल्हा संघ व विभागीय संघाला व्यवस्थापकीय अनुदान १,२५,०००/- रुपये पर्यंत (उतरत्या क्रमाने)

२.११ मच्छिमार आपत सहाय्य निधी

मच्छिमारी हा अत्यंत जोखमीचा व्यवसाय असून त्यात मच्छिमारांना अपघाती मृत्यु आल्यास त्याच्या वारसास सहाय्य देण्यासाठी 'मच्छिमार आपत सहाय्य निधी' उभारण्यात आलेला आहे. त्याशिवाय अपघातात मृत्यु किंवा कायमचे अपंगत्व आल्यास विम्याचे संरक्षण मिळण्यासाठी अपघात गटविमा योजना असून विम्या हप्त्यावर राज्य व केंद्र सरकारकडून अनुदान दिले जाते. ही योजना राष्ट्रीय मत्स्य सहकारी संघापर्यंत राबविण्यात येते. तसेच अवर्षण, पूर, भूकंप, आग, वादळ इ.नैसर्गिक आपत्तीत मच्छिमारांना अर्थसहाय्य देण्याची योजना नोव्हेंबर १९७३ मध्ये शासनाने मंजूर केली आहे. त्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद महसूल विभागाकडून उपलब्ध केली जाते.

सन १९९२-९३ व १९९३-९४ सालातील मत्स्यव्यवसाय अंतर्गत ठाणे जिल्हयातील योजनानिहाय तरतूद, खर्च, लक्ष्य व साध्य इ.बाबतची माहिती परिशिष्ट 'अ' मध्ये दिली आहे.

आठव्या पंचवार्षिक योजना कालावधीत निरनिराळ्या विभागाच्या विकास योजनांकरिता एकूण १८,५२० कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापैकी मत्स्यव्यवसाय योजनांकरिता एकूण २९.१४ लक्ष रुपये नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. मत्स्यव्यवसायासाठी मंजूर करण्यात आलेल्या नियतव्ययाची एकूण सर्व विभागाच्या नियतव्ययाशी टक्केवारी काढली असता ती फक्त ०.१६ इतकीच आहे. याचाच अर्थ मत्स्यव्यवसायासाठी राज्याच्या एकूण विकास योजनांच्या तुलनेने फारच कमी तरतूद करण्यात आली आहे.

आठव्या पंचवार्षिक योजना कालावधीसाठी मत्स्यव्यवसायांतर्गत करण्यात आलेल्या एकूण २९.१४ लक्ष रुपये नियतव्ययापैकी पहिल्या तीन वर्षाच्या कालावधीत (मे, १९९५ अखेर) या विभागाच्या विविध योजनांवर एकंदरीत १७.०६ लाख रुपये इतका खर्च झालेला आहे. एकूण नियतव्ययाशी तीन वर्षात झालेली प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी ५८.५४ एवढी आहे.

# प्रकरण क्र.३

## मूल्यमापन अहवालाची उदिष्टये, कार्यपध्दती व व्याप्ती

मासेमारी हा व्यवसाय फार पुरातन काळापासून आस्तित्वात आहे. किनारपट्टीवरील सर्वसामान्य लोकांच्या आहारात मासळी हा महत्वाचा अन्न घटक असतो. मासळी व तत्सम जलचर प्राणी केवळ अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेच महत्वाचे नसून त्यामुळे सागरी व ग्रामीण भागातील जनतेला मोठ्या प्रमाणावर रोजगारही उपलब्ध होतो. पारंपारिक मच्छिमारांचा पजिविकेचे साधन म्हणून मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे. महाराष्ट्रात मच्छिमारी करणाऱ्यामध्ये भोई, कोळी, कहार, ढिवर या पारंपारिक मच्छिमारांचे प्रमाण जास्त असून त्यामानाने आदिवासी लोकांचा समावेश काहीसा मर्यादितच आहे. मत्स्यव्यवसायामध्ये प्रत्यक्षपणे ५ लाख व अप्रत्यक्षपणे सुमारे १० लाख लोक गुंतलेले आहेत. प्रत्यक्ष मच्छिमारी करणाऱ्या लोकांचे राज्याच्या एकूण लोकसंख्येशी प्रमाण फक्त ०.६३ टक्के इतके असून अप्रत्यक्षपणे मच्छिमारी व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण १.२७ टक्के इतके आहे. याचाच अर्थ मत्स्यव्यवसायात गुंतलेल्या एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्या अगदी अल्प आहे, हे स्पष्ट होते.

सागरी, निमखारे पाणी व भूजलाशयातील मत्स्योत्पादनात वाढ करणे व मच्छिमारांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणे ही मत्स्यव्यवसाय विकासाची प्रमुख उदिष्टये आहेत. पाचव्या पंचवार्षिक योजना कालावधीत सुरु करण्यात आलेली जनजाती क्षेत्र उपयोजना व त्या योजनेच्या अखेरीस सुरु करण्यात आलेली 'अनुसूचित जमातीसाठी विशेष घटक योजना (Special componant Plan)' इ.मधून जनजाती व अनुसूचित जातीसारख्या समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींना इतर मत्स्यव्यवसायाच्या व्यवसायाबरोबरच विविध योजना राबवून त्यांना उपजिविकेसाठी व्यवसाय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तथापि, अद्यापही आदिवासीमध्ये मत्स्यव्यवसाय करण्याची फारशी आवड असल्याचे दिसत नाही. शेतीला पूरक ठरणाऱ्या दुग्धव्यवसाय , कुक्कुटपालन, शेळयापालन इ.दुय्यम व्यवसायात आदिवासींचे जे प्रमाण आहे त्यापेक्षा फारच कमी प्रमाण मत्स्यव्यवसायात आहे. त्यादृष्टीने, शासनाचे मत्स्यव्यवसायाबाबत धोरण, मत्स्यव्यवसायाबाबत असलेली अनुसूचित जमातीच्या लोकांची भूमिका, मत्स्यव्यवसायाचे सद्याचे स्वरुप व भविष्यकाळातील वाव, मत्स्यव्यवसायांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची कार्यपध्दती, मत्स्यव्यवसायातील सहकारी संस्थांचा कार्यभाग तसेच लाभार्थींच्या उत्पन्नाच्या पातळीत झालेला बदल इत्यादी बाबी हा प्रस्तुत मूल्यमापन अभ्यास अहवालातील मुख्य विषय

असून त्यावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने हा मूल्यमापन अहवाल तयार करण्यात आला आहे. प्रस्तुत मूल्यमापन अहवाल तयार करताना खालील प्रमुख उदिष्टये डोळयासमोर ठेवण्यात आली होती.

१. समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या दुबळया घटकांच्या (विशेषत: अनुसूचित जमातीसाठी) विकासात 'मत्स्यव्यवसायाचे' स्थान कसे महत्वाचे आहे. ते जाणून घेणे.

२. मत्स्यव्यवसायांतर्गत राबविण्यात येणाऱ्या निरनिराळया वैयक्तिक व सामुहिक योजनांचे स्वरुप जाणून घेणे.

३. मत्स्योत्पादन विकासासाठी शासनाने निरनिराळया वर्षी केलेली तरतूद, झालेला खर्च, लक्ष्य व साध्य यांची माहिती करुन घेणे.

४. मत्स्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत योजनामध्ये मच्छिमारांचा विशेषत: आदिवासीं मच्छिमारांचा सहभाग व प्रतिसाद आजमावणे.

५. विविध प्रकारच्या मत्स्योत्पादन योजनामुळे लाभार्थीच्या उत्पन्नात झालेला बदल जाणून घेणे.

६. योजना राबविताना योजना राबविणाऱ्या अधिकारी वर्गास येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

७. मत्स्योत्पादन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतील त्रुटी /दोष शोधणे व त्या अनुषंगाने उपाय योजना सुचविणे.

मूल्यमापन अभ्यासाची कार्यपध्दती-

प्रस्तुत मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी सन १९९२-९३ व १९९३-९४ ही दोन वर्षे आधारभूत मानण्यात आली होती. मत्स्यव्यवसाय विकासांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे स्वरुप, संस्थेकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ, तसेच मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी घालून दिलेला कालावधी यांचा विचार करता, महाराष्ट्रातील चारही सागरी जिल्हयात (ठाणे, रायगड, रत्नागिरी, व सिंधुदुर्ग), सर्वेक्षण करणे शक्य नव्हते. म्हणून रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयात आदिवासींचे प्रमाण फारच कमी असल्याने ते जिल्हे सर्वेक्षणासाठी निवडण्यात आले नाहीत. उर्वरित दोन जिल्हयापैकी ज्या जिल्हयात मत्स्यव्यवसाय विकासाच्या जास्तीत जास्त योजना राबविण्यात आल्या आहेत, अशा ठाणे जिल्हयाची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली. त्या अनुषंगाने आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त, पालघर, जि.ठाणे यांच्याशी पत्रव्यवहार करुन त्यांचेकडून मूल्यमापन अहवालासाठी आवश्यक असणारी उपरोक्त संदर्भीय वर्षातील मूलभूत माहिती प्रथम गोळा करण्यात आली आहे.

क्षेत्रीय पाहणीसाठी आवश्यक असणारी तीन निरनिराळी प्रपत्रे तयार करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रपत्र क्र. १ | कार्यान्वय अधिकारी यांचेकडून माहिती घेण्यासाठी तयार करण्यात आलेले प्रपत्र |
| २. | प्रपत्र क्र. २ | मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था चालकांकडून माहिती घेण्यासाठी तयार करण्यात आलेले प्रपत्र |
| ३. | प्रपत्र क्र. ३ | लाभार्थीकडून माहिती भरुन घेण्यासाठी तयार करण्यात आलेले प्रपत्र |

वरील तीनही प्रपत्रे परिशिष्ट 'ब' मध्ये दिलेली आहेत.

## सर्वेक्षण पध्दती तसेच सर्वेक्षणासाठी निवडण्यात आलेले क्षेत्र, सहकारी संस्था व लाभार्थी

आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र शासन व सहाय्यक संचालक, मत्स्यव्यवसाय पालघर, जि. ठाणे यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या मूलभूत माहितीचा अभ्यास करुन तसेच त्यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन मत्स्यव्यवसायातील सहकारी संस्था व लाभार्थी यांच्या पाहणीसाठी निवड करण्याच्या दृष्टीने काही निष्कर्ष ठरविण्यात आले. ते पुढीलप्रमाणे

ज्या मच्छिमार सहकारी संस्थेमार्फत जास्तीत जास्त आदिवासी लाभार्थींना लाभ देण्यात आला, म्हणजे ज्या सहकारी संस्थेत जास्तीत जास्त आदिवासी सभासद आहेत, अशा सहकारी संस्था पाहणीसाठी निवडावयाचे ठरले. तसेच लाभार्थीची निवड करताना जास्तीत जास्त आदिवासी सभासद असलेल्या सहकारी संस्थापैकी किमान ७ ते ८ टक्के इतके लाभार्थी पाहणीसाठी निवडण्याचे ठरविण्यात आले. पाहणीसाठी निवडावयाचे मच्छिमार सहकारी संस्थांतील सभासद निरनिराळया गांवातील व तालुक्यातील असावेत असेही ठरविण्यात आले.

ठाणे जिल्हयामध्ये सध्या एकूण ८२ मच्छिमार सहकारी संस्था असून त्यापैकी १६ मच्छिमार सहकारी संस्थामध्ये आदिवासी सभासद आहेत. या १६ मच्छिमार सहकारी संस्थापैकी बहुसंख्येने आदिवासी लाभार्थी असलेल्या फक्त ६ मच्छिमार सहकारी संस्था आहेत. त्यापैकी खालील तीन मच्छिमार सहकारी संस्थांची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात येऊन त्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रपत्र-२ मध्ये त्यांची माहिती भरुन घेण्यात आली.

| अ.क्र. | मच्छिमार सहकारी संस्थेचे नांव व पत्ता | लाभार्थी |
|---|---|---|
| १. | श्री कपिलेश्वर आदिवासी मच्छिमार सहकारी संस्था, दापचरी, ता.डहाणू, जि.ठाणे | एकुण ८५ लाभार्थीपैकी ७० आदिवासी लाभार्थी |
| २. | गांजे आदिवासी विविध कार्यकारी संस्था, मु.गांजे, पो.गांजे, पो.ढेकाळे, ता.पालघर, जि.ठाणे | एकूण ९५ लाभार्थीपैकी ६८ आदिवासी लाभार्थी |
| ३. | भातसा जिंदाबाद मच्छिमार सहकारी संस्था, मु.भातसानगर, ता.शहापूर, जि.ठाणे | एकूण ९८ लाभार्थीपैकी २५ आदिवासी लाभार्थी |

वरील तीन मच्छिमार सहकारी संस्थामधील निरनिराळ्या १३ गांवातील एकूण ३६ लाभार्थी पाहणीसाठी निवडण्यात येऊन त्यांची माहिती प्रपत्र क्र.३ मध्ये भरुन घेण्यात आली. पाहणीसाठी निवडण्यात आलेले तालुके, गांवे, सहकारी संस्था व लाभार्थी यांची थोडक्यात माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्र.३.१

| अ.क्र. | तालुका | निवडलेल्या गांवाची संख्या | निवडलेल्या मच्छिमार सहकारी संस्थांची संख्या | निवडलेल्या लाभार्थींची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | पालघर | ४ | १ | ४ |
| २. | डहाणू | २ | १ | ११ |
| ३. | तलासरी | ४ | - | ११ |
| ४. | शहापूर | ३ | १ | ८ |
| एकूण | ४ | १३ | ३ | ३६ |

# प्रकरण क्र.४

## पाहणीतील सांख्यिकी माहितीचे पृथःकरण/विश्लेषण

४.१ प्रकरण क्र.३ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे ठाणे जिल्हयातील मच्छिमार सहकारी संस्थापैकी ज्या मच्छिमार सहकारी संस्थेत जास्तीत जास्त आदिवासी सभासद आहेत, अशा तीन मच्छिमार सहकारी संस्था पाहणीसाठी निवडण्यात आल्या. त्यांना भेटी देऊन सहकारी संस्था चालक व त्यातील काही सभासदांच्या मुलाखती घेण्यात आल्या. लाभार्थींची व मच्छिमारी सहकारी संस्थांची माहिती विहित प्रपत्रात नोंदवून घेण्यात आली. त्या माहितीच्या आधारे प्रस्तुत मूल्यमापन अहवालाचा सांख्यिकी गोषवारा तक्ता क्र.४.१ ते तक्ता क्र.४.९ मध्ये दिलेला आहे.

तक्ता क्र.४.१

निवडलेल्या लाभार्थींचे जमातीनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | तालुका | लाभार्थ्यांची जमातनिहाय वर्गवारी | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मल्हार कोळी | ठाकूर | कातकरी | वारली | धोडी | |
| १. | डहाणू | - | - | - | १० | १ | ११ |
| २. | पालघर | ६ | - | - | - | - | ६ |
| ३. | तलासरी | - | - | ११ | - | - | ११ |
| ४. | शहापूर | - | ८ | - | - | - | ८ |
| एकूण | | ६ | ८ | ११ | १० | १ | ३६ |
| टक्केवारी | | १६.६६ | २२.२४ | ३०.५५ | २७.७७ | २०.७८ | १०० |

पाहणी केलेल्या लाभार्थींचे जमातीनिहाय वर्गीकरण केले असता, असे निदर्शनास येते की, एकूण ३६ लाभार्थीपैकी मल्हार कोळी जमातीचे ६, ठाकूर जमातीचे ८, कातकरी जमातीचे ११, वारली जमातीचे १० तर धोडी जमातीचा एक लाभार्थी आहे. कातकरी या जमातीचे लाभार्थी सर्वात जास्त असून त्यांची टक्केवारी ३०.५५ आहे. वारली जमातीचे २१.७७ टक्के लाभार्थी असून त्या खालोखाल ठाकूर जमातीचे २२ टक्के, तर मल्हार कोळी जमातीचे १७ टक्के इतके लाभार्थी असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ४.२

लाभार्थ्यांच्या कुटुंबाचे आकारमानानुसार वर्गीकरण

| अ. क्र. | जमात | कुटुंबाचे आकारमान | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ व्यक्ती पर्यंत | ६ ते ८ व्यक्तीपर्यंत | ९ ते ११ पर्यंत व्यक्ती | ११ पेक्षा जास्त व्यक्ती | |
| १. | मल्हार कोळी | ६ | - | - | - | ६ |
| २. | ठाकूर | ५ | ३ | - | - | ८ |
| ३. | कातकरी | ८ | ३ | - | - | ११ |
| ४. | वारली | ७ | २ | १ | - | १० |
| ५. | धोडी | - | १ | - | - | १ |
| | एकूण | २६ | ९ | १ | - | ३६ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सर्वेक्षित एकूण लाभधारक कुटुंबापैकी २६ कुटुंबामध्ये (७२%) ५ पर्यंत व्यक्ती आहेत. ९ कुटुंबामध्ये (२५%) ८ पर्यंत व्यक्ती असून केवळ एकाच कुटुंबामध्ये ११ पर्यंत व्यक्ती असल्याचे दिसून येते. ११ व्यक्तीपेक्षा जास्त आकारमानाचे एकही कुटुंब पाहणीमध्ये आढळले नाही. थोडक्यात सर्व्हे केलेल्या बहुतांश लाभार्थी कुटुंबाचे आकारमान लहान किंवा मर्यादित असल्याचे स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.३

शैक्षणिक पात्रतेनुसार विविध जमातींच्या लाभार्थ्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | जमात | निरक्षर लाभार्थी | साक्षर लाभार्थी | | | | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इ.४ थी पर्यंतचे लाभार्थी | इ.५ वी ते ७ वी पर्यंतचे लाभार्थी | इ.७ वी ते १० वी पर्यंतचे लाभार्थी | १० वी पेक्षा जास्त | |
| १. | मल्हार कोळी | - | २ | २ | २ | - | ६ |
| २. | ठाकूर | ६ | १ | १ | - | - | ८ |
| ३. | कातकरी | ५ | ४ | २ | - | - | ११ |
| ४. | वारली | ६ | ३ | १ | - | - | १० |
| ६. | धोडी | १ | - | - | - | - | १ |
| | एकूण | १८ | १० | ६ | २ | - | ३६ |
| | टक्केवारी | ५० | २७.७८ | १६.६७ | ५.५५ | - | १०० |

उपरोक्त तक्त्यामधील महितीचे पृथःकरण केले असता असे दिसून येते की, पाहणी केलेल्या लाभार्थ्यामध्ये ५० टक्के लाभार्थी निरक्षर असून उर्वरित ५० टक्के लाभार्थी अल्पशिक्षित आहेत. एकाही

लाभार्थ्यीने १० वीच्या पुढे शिक्षण घेतल्याचे दिसून येत नाही. जमातीनिहाय विचार केला असता वारली, ठाकूर व त्या खालोखाल कातकरी या जमातीच्या लाभार्थ्यांमध्ये जास्त निरक्षर लाभार्थी असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.४.४

वार्षिक उत्पन्नाप्रमाणे लाभार्थीचे वर्गीकरण

| अ. क्र. | जमात | लाभार्थी संख्या | रु.१००० पेक्षा कमी | १००१ ते ५००० पर्यंतचे लाभार्थी | ५००१ ते ११००० पर्यंतचे लाभार्थी | ११,००१ ते १५,०००पर्यंतचे लाभार्थी | १५,००० च्या वर उत्पन्न असलेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मल्हार कोळी | ६ | - | - | १ | २ | ३ |
| २. | ठाकूर | ८ | - | - | २ | १ | ५ |
| ३. | कातकरी | ११ | - | १ | १० | - | - |
| ४. | वारली | १० | - | - | - | ४ | ६ |
| ६. | धोडी | १ | - | - | - | - | १ |
| | एकूण | ३६ | - | १ | १३ | ७ | १५ |
| | टक्केवारी | १०० | - | २.७७ | ३६.११ | १९.४६ | ४१.६६ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, सर्वेक्षित केलेल्या एकूण ३६ लाभार्थ्यांपैकी २२ लाभार्थ्यांचे (६१%) वार्षिक उत्पन्न हे रु.११,००० पेक्षा जास्त आहे. रु.१५,००० पेक्षा जास्त उत्पन्न असलेले एकूण १५ लाभार्थी असून सर्वात जास्त वारली जमातीचे (६) व त्या खालोखाल ठाकूर जमातीचे (५) लाभार्थी असल्याचे दिसून येते.

सर्वेक्षित ३६ लाभार्थ्यांपैकी १३ लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न दारिद्रय रेषेखाली असल्याचे दिसून येते. दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांचे प्रमाण ३६.११ इतके आहे.

तक्ता क्र.४.५

जमातनिहाय लाभार्थींचे शेतीपासून सरासरी उत्पन्न

| अ. क्र. | जमात | सर्वेक्षित लाभार्थी | जमीन असलेले लाभार्थी | शेतीपासूनचे एकूण वार्षिक उत्पन्न | शेतीपासूनचे सरासरी वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १. | मल्हार कोळी | ६ | २ | ५०००/- | २५००/- |
| २. | ठाकूर | ८ | २ | २०००/- | १०००/- |
| ३. | कातकरी | ११ | १ | २५००/- | २५००/- |
| ४. | वारली | १० | २ | ११०००/- | ५५००/- |
| ६. | धोडी | १ | १ | ३०००/- | ३०००/- |
| | एकूण | ३६ | ८ | २३५००/- | २९३७/- |

उपरोक्त तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, मच्छिमार आदिवासी लाभार्थ्यांमध्ये भूमीहीनांचे प्रमाण जास्त आहे. सर्वेक्षित ३६ लाभधारकांपैकी फक्त ८ लाभधारकांकडे (२२%) जमीन आहे. उर्वरित २८ लाभधारक (७८ %) भूमीहीन आहेत. प्रत्येक लाभधारकाचे शेतीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न रुपये २९३७/- एवढे आहे. शेतीपासून सर्वात जास्त सरासरी उत्पन्न मिळविणारे लाभार्थी वारली जमातीचे असल्याचे दिसून येते. शेतीपासून सर्वात कमी सरासरी उत्पन्न ठाकूर जमातीच्या लाभार्थींचे असल्याचे दिसून येते. थोडक्यातए, शेती असणाऱ्या लाभार्थ्यांना शेतीपासून म्हणावे तसेच उत्पन्न मिळत नसल्याचे दिसते.

तक्ता क्र.४.६

जमातनिहाय मजूरीपासून उत्पन्न मिळविणारी कुटुंबे

| अ.क्र. | जमात | सर्वेक्षित कुटुंबे | मजूरीपासूनचे एकूण उत्पन्न | सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १. | मल्हार कोळी | ६ | २८०००/- | ४६६७/- |
| २. | ठाकूर | ८ | ४३०००/- | ५३७५/- |
| ३. | कातकरी | ११ | ३५३००/- | ३२०९/- |
| ४. | वारली | १० | ४८५००/- | ४८५०/- |
| ६. | धोडी | १ | ४५००/- | ४५००/- |
| | एकूण | ३६ | | |

उपरोक्त तक्त्यातील माहितीचे पृथःकरण केले असता असे दिसून येते की, सर्व जमातीचे लाभार्थी मच्छिमारी बरोबरच मजूरी हा व्यवसाय देखील करतात. प्रत्येक लाभार्थींचे मजूरीपासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वसाधारणपणे रु.३००० ते ५००० पर्यंत असल्याचे दिसते. ठाकूर जमातीच्या लाभधारकांचे

मजूरीपासूनचे सरासरी उत्पन्न सर्वात जास्त रु.५,३७५/- इतके असून सर्वात कमी उत्पन्न रु.३,२०९/- कातकरी लाभार्थींचे असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.४.७

जमातनिहाय मत्स्यव्यवसायापासूनचे लाभार्थी कुटुंबाचे सरासरी उत्पन्न

| अ.क्र. | जमात | सर्वेक्षित लाभार्थी | मत्स्यव्यवसाया पासूनचे एकूण वार्षिक उत्पन्न | सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १. | मल्हार कोळी | ६ | ५७६००/- | ९६००/- |
| २. | ठाकूर | ८ | ९३५००/- | ११६८७/- |
| ३. | कातकरी | ११ | ३७३००/- | ३३९१/- |
| ४. | वारली | १० | १०९०००/- | १०९००/- |
| ६. | धोडी | १ | ९५००/- | ९५००/- |
| एकूण | | ३६ | | |

तक्ता क्र.४.७ मधील माहितीवरुन असे दिसून येते की, ठाकूर जमातीतील लाभार्थींचे मत्स्यव्यवसायापासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्वात जास्त म्हणजे ११ हजारापेक्षा जास्त असून त्या खालोखाल वारली, मल्हार कोळी यांचा क्रमांक लागतो. मत्स्यव्यवसायपासून सर्वात कमी उत्पन्न कातकरी लाभार्थ्यांना मिळाल्याचे दिसून येते. इतर व्यवसायातील उत्पन्नाशी तुलना करता मत्स्यव्यवसायापासून लाभार्थ्यांना चांगले उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.४.८

जमातनिहाय व साधननिहाय लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न

| अ. क्र. | जमात | लाभार्थी संख्या | साधननिहाय सरासरी उत्पन्न | | | सर्वसाधारण सरासरी उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | शेतीपासून | मजूरीपासून | मत्स्यव्यवसायापासून | |
| १. | मल्हार कोळी | ६ | २५००/- | ४६६७/- | ९६००/- | १५१००/- |
| २. | ठाकूर | ८ | १०००/- | ५३७५/- | ११६८७/- | १७३१३/- |
| ३. | कातकरी | ११ | २५००/- | ३२०९/- | ३३९१/- | ६८२७/- |
| ४. | वारली | १० | ५५००/- | ४८५०/- | १०९००/- | १६८५०/- |
| ६. | धोडी | १ | ३०००/- | ४५००/- | ९५००/- | १७०००/- |
| एकूण | | ३६ | १४५००/- | २२६०१/- | ४५०७८/- | ७३०९०/- |

वरील तक्तयातील माहितीचे पृथ:करण करता असे दिसून येते की, सर्वेक्षित एकूण ३६ लाभार्थी

कुटुंबाचे शेतीपासून, मजूरीपासून व मत्स्यव्यवसायापासून सरासरी उत्पन्न अनुक्रमे रु.१४,५००/-, २२,६०१/- व र.४५,०७८/- इतके असल्याचे दिसते. वारली जमातीच्या कुटुंबाला शेतीपासून सर्वात जास्त सरासरी उत्पन्न मिळाले. तर कातकरी जमातीच्या कुटुंबांना सर्वात कमी म्हणजे रुपये २,५००/- सरासरी उत्पन्न मिळाल्याचे दिसून येते. मजूरीपासून ठाकूर जमातीच्या लाभधारकांना सर्वात अधिक उत्पन्न मिळाले. तर सर्वात कमी उत्पन्न कातकरी लाभधारकांना मिळाल्याचे आढळून येते. मत्स्यव्यवसायपासून सर्वात जास्त सरासरी उत्पन्न ठाकूर जमातीच्या लाभधारकांना मिळाल्याचे निदर्शनास येते. याउलट, सर्वात कमी सरासरी उत्पन्न कातकरी जमातीच्या लाभार्थ्यांना मिळाल्याचे दिसून येते. सर्वसाधारणपणे एकत्रित विचार करता सर्वात जास्त सरासरी उत्पन्न ठाकूर जमातीच्या लाभार्थ्यांना मिळाल्याचे दिसून येते. त्या खालोखाल धोडी व वारली या जमातीच्या लाभधारकांचा क्रमांक लागतो. सर्व साधनांपासून सर्वात कमी सरासरी उत्पन्न कातकरी या लाभार्थींचे असल्याचे दिसून येते. वरील सर्व बाबी विचारात घेता असे निदर्शनास येते की, शेती व मजूरी या व्यवसायातील सरासरी उत्पन्नापेक्षा मत्स्यव्यवसायापासूनचे वार्षिक सरासरी उत्पन्न सर्व जमातींच्या लाभार्थ्यांना जास्त प्रमाणात मिळाल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.४.९

जमातनिहाय लाभार्थींचे मत्स्यव्यवसायपासूनचे योजनांचा लाभ घेण्यापूर्वीचे आणि नंतरचे एकूण व सरासरी उत्पन्न दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जमाती | लाभार्थी कुटुंबे | लाभ घेण्यापूर्वीचे उत्पन्न (रुपये) | | लाभ घेतल्यानंतरचे उत्पन्न (रुपये) | | उत्पन्नात झालेली वाढ किंवा घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण उत्पन्न | सरासरी उत्पन्न | एकूण उत्पन्न | सरासरी उत्पन्न | |
| १. | मल्हार कोळी | ६ | २७९००/- | ४६५०/- | ५७६००/- | ९६००/- | (+)४९५०/- |
| २. | ठाकूर | ८ | ७३०००/- | ९१२५/- | ९३५००/- | ११६८७/- | (+)२५६२/- |
| ३. | कातकरी | ११ | २७०००/- | २४५५/- | ३७३००/- | ३३९१/- | (+) ९३६/- |
| ४. | वारली | १० | ४६५००/- | ४६५०/- | १०९००/- | १०९००/- | (+)६२५०/- |
| ६. | धोडी | १ | ४५००/- | ४५००/- | ९५००/- | ९५००/- | (+)५०००/- |
| एकूण | | ३६ | १७८९००/ | २५३८०/ | ३०६९००/ | ४५०७८/- | ११६९८/- |

वरील तक्त्यातील माहितीचे पृथःकरण करता खालील बाबी निदर्शनास येतात.

१. योजनेचा लाभ घेण्यापूर्वी व योजनेचा लाभ घेतल्यानंतर लाभधारक कुटुंबाच्या सरासरी उत्पन्नाच्या तुलनात्मक आकडेवारीवरुन असे दिसून येते की, ठाकूर जमातीच्या लाभार्थीचे मत्स्यव्यवसायापासूनचे सरासरी उत्पन्न रु.९,१२५/- वरुन रुपये ११,६८७/- एवढे वाढले. त्या खालोखाल वारली, मल्हार कोळी, धोडी या जमातीच्या लाभार्थ्यांच्या उत्पन्नात योजनेचा लाभ घेतल्यानंतर वाढ झालेली दिसते. कातकरी जमातीच्या लाभार्थीचे योजनेचा लाभ घेण्यापूर्वीचे सरासरी उत्पन्न रुपये २.४५५/- होते ते लाभ घेतल्यानंतर रु.३,३९१/- इतके झाले. एकंदरीत पाहता योजनेचा लाभ घेतल्यामुळे सर्व जमातीच्या लाभधारकांच्या उत्पन्नामध्ये वाढ झालेली दिसून येते.

# प्रकरण क्र.५

## मूल्यमापन अहवालातील निरीक्षणात्मक बाबी

### (अ) आदिवासी लोकांसंदर्भात

१. पारंपारिक मच्छिमारांचा स्वत:च्या उपजिवकेचे साधन म्हणून मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे. समुद्र किनाऱ्यावर व अंतर्गत भागात राहणाऱ्या कोळी, भोई, ढिवर इत्यादी मागासलेल्या जातीचे लोक मत्स्यव्यवसायात जास्त असल्याचे निदर्शनास आले. त्या मानाने, मत्स्यव्यवसाय करणारे आदिवासी जमातीचे लोक अत्यल्प असल्याचे दिसून येते. राज्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मत्स्यव्यवसाय करणाऱ्यांची एकूण लोकसंख्या साधारणपणे १० लक्ष इतकी असून राज्यातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत मत्स्यव्यवसायात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण फक्त १.२७ टक्के इतके आहे. त्यामुळे मत्स्यव्यवसाय करणारी महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या अगदी अल्प आहे, असे म्हणावे लागेल. राज्यातील आदिवासी जमातीपैकी मुख्यत: कातकरी, ठाकूर, मल्हार कोळी, वारली याच जमातीचे थोडेफार लोक या व्यवसायात गुंतले असल्याचे दिसून येते.

२. मत्स्यव्यवसाय अंतर्गत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आदिवासी जमातीचे लोक फारसे उत्सुक नसल्याचे समजते. मत्स्यव्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामुग्रीचा अभाव, मत्स्य उत्पादनाची अनिश्चितता, त्या व्यवसायातील कष्ट, अडचणी व धोके लक्षात घेता रोजंदारी सारखा सहजासहजी उपलब्ध होणारा व उत्पन्नाची खात्री असणारा विनासाधन सामुग्रीचा व्यवसाय करण्याकडे (उदा. शेतमजूरी, समुद्रातील वाळू काढणे, वीटभट्टीवर काम करणे) त्यांचा कल असल्याचे आढळून येते.

३. समुद्र किनारा नसलेल्या जिल्हयामध्ये जे आदिवासी लोक मत्स्यव्यवसाय करतात, त्यापैकी बऱ्याच लोकांचा मच्छिमारी व्यवसाय हा केवळ अर्धवेळ (Part-time) असा असतो. पकडलेल्या मासळीतून स्वत:ची गरज भागवून शिल्लक राहिलेली मासळी स्थानिक बाजारात विकून ते उत्पन्नात थोडीफार भर घालतात. त्यांची मच्छिमारीची पध्दतीही जुनी असते. ठाणे, रायगड या सागरी जिल्हयांतील कातकरी या आदिम जमातीच्या लोकांची मासेमारी ही मुख्यत्वेकरुन वरीलप्रमाणे असते. स्थानिक नदी, नाले, ओढे, इत्यादी ठिकाणी ते पारंपारिक पध्दतीने मच्छिमारी करीत असल्याचे निदर्शनास आले. मासेमारीसाठी बहुसंख्य कातकरी मासेमारांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात नसल्याचे समजते.

४. मच्छिमारी करणाऱ्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण फारच कमी असल्याचे दिसून येते. याचे प्रमुख कारण म्हणजे मत्स्यव्यवसाय हा कदाचित फारसा प्रतिष्ठीत समजला जात नसावा. त्यामुळे मच्छिमारी कुटुंबातील

जास्तीत जास्त सुशिक्षित तरुण नोकरी अगर इतर व्यवसायाकडे वळतात. मुलाखती घेतलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी जवळ जवळ ५० टक्के लाभार्थी निरक्षर असल्याचे दिसून आले. उरलेल्या लाभार्थ्यांपैकी बरेच लाभार्थी केवळ अल्प शिक्षित असल्याचे पाहणीत आढळून आले.

५. सागरी जिल्हयामध्ये मच्छिमारी करणाऱ्यामध्ये बहुतांश लोक हे भूमीहीन असल्याचे व इतर जिल्हयामध्ये या व्यवसायात गुंतलेले बहुतांश लोक अल्प किंवा अत्यल्प भूधारक असल्याचे मत्स्यव्यवसाय योजना राबविणाऱ्या संबंधित कार्यालयाकडून समजले. सर्वेक्षण केलेल्या एकूण ३६ आदिवासी लाभार्थ्यांपैकी ७२.२२ टक्के लाभार्थी हे भूमीहीन असल्याचे दिसून आले. उरलेलया भूमीधारक लाभार्थ्यांपैकी एकाही लाभार्थ्याकडे ५ एकरापेक्षा जास्त जमीन नसल्याचे आढळून आले. याचाच अर्थ असा की, मत्स्यव्यवसायांतर्गत योजनांचा लाभ घेणाऱ्यामध्ये भूमीहीन व अल्पभूधारकच जास्त आहेत.

६. पाहणी केलेल्या एकूण लाभार्थ्यांपैकी सर्वच लाभार्थी हे योजनांचा लाभ घेण्यापूर्वीपासूनच जुन्या पध्दतीने मत्स्यव्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले. योजनांचा लाभ घेतल्यानंतर बहुतेक सर्व लाभार्थ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ झाल्याचे पाहणीत आढळून आले. पाहणी केलेल्या एकूण लाभार्थींपैकी ६१ टक्के लाभार्थी उत्पन्न योजनेचा लाभ मिळाल्यानंतर दारिद्रय रेषेच्यावर गेल्याचे निदर्शनास आले.

७. सद्यस्थितीत लाभार्थींना मच्छिमारी सहकारी संस्थामार्फत पुरविण्यात येणाऱ्या बोटी या बहुधा हाताने चालवाव्या लागतात, असे दिसून आले. यामुळे श्रमाचा व वेळेचा अपव्यय होतो. शिवाय मच्छिमारांनी समुद्रात लावलेल्या जाळी चोरणाऱ्या लोकांना अशा बोटीमुळे सहजासहजी पकडता येत नाही. त्याचप्रमाणे पाण्यात विषारी औषधे टाकून, मासे, कोळंबीचा नाश करणाऱ्या लोकांचा त्वरीत पाठलाग करता येत नाही, असे सर्वेक्षण केलेल्या लाभार्थींकडून समजले.

ब. **सर्वसाधारण :-**

८. असे दिसून येते की, मत्स्यव्यवसाय विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनापैकी बहतांश योजना हया गटस्वरुपात किंवा सहकारी संस्थामार्फत राबविल्या जातात. मत्स्यव्यवसाय योजनांतर्गत वैयक्तिक योजनांचे प्रमाण कमी आहे. (उदा. आदिम जमातीसाठी मच्छिमारी जाळी, दोर, सूत, तसेच मच्छिमारांना मत्स्यबीजाचा पुरवठा इ.) वैयक्तिक लाभाच्या योजनांचे प्रमाण अल्प असल्याने वैयक्तिकरित्या मच्छिमारी करणाऱ्या व्यक्तींना या गट योजनांपासून विशेष लाभ घेता येत नाही.

९. भूजलाशयातील मच्छिमारी संदर्भात असे निदर्शनास आले की, काही वेळा तलावाकाठच्या/धरणाकाठच्या गांवातील लोकांकडून विनापरवाना चोरटी मासेमारी केली जाते. त्यामुळे अधिकृत मासेमारी परवाना असलेल्या संस्थांना अगर व्यक्तींना त्याची झळ पोहचणे काही वेळेस अशा

जलाशयात विषारी औषधे टाकली जातात व माशांचा नाश केला जातो, असे योजना कार्यान्वित करणाऱ्या अधिकाऱ्यांकडूनही समजले. अशा परिस्थितीत पात्र व परवानाधारक मच्छिमारांना अपेक्षित मासळी उत्पादन मिळू शकत नाही. कित्येकवेळा उपासमारही सोसावी लागते.

१०. शासकीय मालकीची धरणे, तलाव, तळी इत्यादी जलाशये मच्छिमारांना किंवा त्यांच्या सहकारी संस्थांना लिलाव पध्दतीने मच्छिमारीसाठी देण्यात येतात. लिलाव पध्दतीमध्ये ज्याच्याकडून जादा पैसे मिळतात, अशा व्यक्तींना किंवा संस्थांना लिलाव दिला जातो. अशा परिस्थिती पुष्कळदा स्थानिक पैसेवाले बिगर आदिवासी लोक जादा पैशाच्या जोरावर लिलावाने शासकीय मालकीची जलाशये मासेमारीसाठी घेतात. त्यामुळे आर्थिकदृष्टया मागासलेल्या व कमकुवत असलेल्या आदिवासींसारख्या मच्छिमारांना व किंवा अल्पसंख्याकांना अशी सार्वजनिक मच्छिमारी स्थाने मिळविणे दुरापास्त होते.

११. काही वेळा केवळ प्रशासकीय कारणास्तव मच्छिमारी करणाऱ्या लोकांना मत्स्यव्यवसाय योजनांचा फायदा घेता येत नाही, असे निदर्शनास आले. उदा. पंचायत समिती, तलासरी, जि. ठाणे अंतर्गत पशुसंवर्धन अधिकाऱ्यांचे एक पद बरेच दिवस रिक्त असल्याचे पाहणीच्या वेळी आढळून आले. त्यामुळे कातकरी या आदिम जमातीच्या मच्छिमारांना द्यावयाच्या वेढी जाळयापैकी बरीच जाळी लाभार्थींना दिली गेली नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे बरेच आदिवासी मच्छिमार या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे दिसून आले.

१२. मच्छिमार हा आर्थिक दुर्बल असल्याने त्यांना रोजच्या मासेमारीसाठी अत्यावश्यक असलेल्या मच्छिमारी साधनांची खरेदी करणे देखील वाढत्या किंमतीमुळे दुरापास्त होते. मच्छिमारांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन शासनाने या व्यवसायासाठी आवश्यक त्या वस्तु उदा. नॉयलॉन धागा, गारीफल दोर, सुतापासून बनविलेली जाळी, बिगर यांत्रिक नौकासाठी अर्थसहाय्य इ. वेगवेगळया दराने पुरविल्याचे दिसून आले. आदिम जमातीच्या मच्छिमारांना पुरविण्यात येणारी मच्छिमार जाळी 'विशेष केंद्रीय अर्थसहाय्य निधीतून' व १०० टक्के अनुदानावर पुरविण्यात आल्याचे दिसून आले. आदिवासी लाभार्थ्यांकडून त्यास विशेष प्रतिसाद मिळत असल्याचे योजना राबविणाऱ्या कार्यालयाकडून समजले.

१३. मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमांतर्गत अनेक योजनापैकी मच्छिमार तरुणांना 'प्रशिक्षण' ही एक योजना आहे. या योजनेचा कालावधी एक महिना असून मच्छिमार तरुणांना आधुनिक मच्छिमारीची तंत्रे विविध मत्स्यबीज केंद्रावर नेऊन प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितली जातात. तथापि, या योजनेचा लाभ घेण्यासाठी फारसे लाभार्थी पुढे येत नसल्याचे पाहणीत आढळून आहे. याची कारणे जाणून घेतली असता, लाभार्थींची प्रशिक्षणाबाबत उदासिनता, प्रशिक्षण केंद्रे त्यांच्या गांवापासून दूर अंतरावर असणे व प्रशिक्षण कालावधीत मिळणारे २०० रु. अल्प विद्यावेतन, प्रशिक्षणाची वेळ दिवसभरात केव्हाही असणे इ. महत्वाची

कारणे असल्याचे दिसून आले.

१४. असे दिसून आले की, पूर्वी मच्छिमारांना त्यांनी पकडलेल्या मासळीची विक्री करण्यासाठी बहुतांशी खाजगी व्यापाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत असे व त्याचा परिणाम त्याला व्यापाऱ्याकडून मिळणाऱ्या मासळीच्या दरावर व पर्यायाने उत्पन्नावर होत असे. परंतु आता राष्ट्रीय सहकारी विकास निगमच्या अर्थसहाय्याने मासेमारी, सहकारी संस्थांना वाहने खरेदीसाठी तसेच शीतगृहे बांधण्यासाठी १०० टक्के अर्थसहाय्य देण्याची योजना विभागामार्फत कार्यान्वित असल्याने मासेमारी सहकारी संस्थांच्या सभासदांना त्यांनी पकडलेल्या मासळीची रास्त किंमत मिळू लागली आहे.

१५. सध्या राज्यात एकूण २०९९ मच्छिमार सह.संस्था असून त्यापैकी भूजलाशयीन क्षेत्रात १७०० व सागरी क्षेत्रात ३९९ संस्था आहेत. फक्त ठाणे जिल्हयाचा विचार केला असता असे दिसून आले की, ठाणे जिल्हयात एकूण ८२ मच्छिमार सहकारी संस्था असून त्यापैकी थोडेफार आदिवासी सभासद असलेल्या फक्त १६ मच्छिमार सहकारी संस्था आहेत. म्हणजेच ठाणे जिल्हयात आदिवासी सभासद असलेल्या मच्छिमार सह.संस्था फक्त १९ टक्केच आहेत. बहुसंख्य आदिवासी सभासद असलेल्या फक्तच सहाच (६) मच्छिमार सहकारी संस्था ठाणे जिल्हयात आहेत. याचाच अर्थ असा की, बहुसंख्य आदिवासी सभासद असलेल्या मच्छिमार सहकारी संस्थांचे प्रमाण ठाणे जिल्हयात फारच कमी (७%) आहे.

१६. महाराष्ट्रात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते १९९४-९५ अखेर मत्स्यव्यवसायाच्या विविध योजनांवर सुमारे २०० कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. या कालावधीत मच्छि उत्पादनदेखील दुप्पटीने वाढले असल्याचे दिसून येते. राज्याच्या एकंदरीत उत्पादनात मासळी उत्पादनामुळे १५०० कोटी रुपयांची भर पडते. तसेच ३५० कोटी रुपयाचे परकीय चलन उपलब्ध होते. याचाच अर्थ असा की, राज्यात मत्स्योत्पादनाला फार वाव आहे. राज्याची सागरी मत्स्योत्पादन क्षमता ३.७५ लक्ष टन इतकी अंदाजित करण्यात आली असून प्रत्यक्षात मात्र गेल्या काही वर्षात ३.६० ते ३.७० लक्ष टनांच्या जवळपासच उत्पादन स्थिरावल्याचे दिसून येते. अधिक खोल पाण्यातील मासेमारीसाठी आवश्यक असणाऱ्या बोटींची व इतर साधनांची कमतरता, वाईट सागरी हवामान, उथळ पाण्यात कमी प्रमाणात मासे उपलब्ध होणे, इ.त्यामागची कारणे असल्याचे समजते.

१७. महाराष्ट्रातील सागरी, निमखाऱ्या पाण्यातील तसेच गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन राष्ट्रीय सरासरी मत्स्योत्पादनापेक्षा बरेच कमी असल्याचे दिसून येते. राज्यात सागरी भागात राहणाऱ्या लोकांना वर्षाकाठी दरडोई सरासरी ३ किलो तर अंतर्गत भागात राहणाऱ्या लोकांना सरासरी फक्त १ किलो एवढीच मासळी उपलब्ध होते. आंतरराष्ट्रीय प्रमाणाप्रमाणे दरडोई प्रतिवर्षी १० ते १२ किलो मासळी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

१८. समुद्रात उपलब्ध असलेली मासळी नवीन तंत्रज्ञान वापरुन काढणे फार महत्वाचे असते. त्यादृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागाने पारंपारिक नौकामध्ये आवश्यक ते बदल करण्याचे व त्यांचे यांत्रिकीकरण करण्याचे ठरविले व मच्छिमारांनीही त्यास चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे राज्यातील मच्छिमार बोटींची यांत्रिकीकरणाची योजना मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसून येते. आजमितीस राज्यातील यांत्रिकी नौकांची संख्या जवळपास ८००० असून त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या नौकांचा समावेश आहे. एवढे असूनसुध्दा खोल पाण्यातील मासेमारीच्या दृष्टीने मोठ्या आकाराच्या मासेमारी बोटी कमीच असल्याचे दिसून येते. त्याचा परिणाम म्हणून खोल पाण्यातील मच्छिमारी त्यामानाने कमी असल्याचे दिसून येते.

१९. सन १९९१-९२ सालापासून राज्याने मत्स्यबीज निर्मितीच्या क्षेत्रात स्वयंपूर्णता प्राप्त केल्याचे दिसून येते. (पूर्वी पश्चिम बंगालमधून मत्स्यबीजाची आयात केली जात होती.) त्यामुळे राज्यातील भूजलाशयीन क्षेत्रात मत्स्यसंवर्धकांना त्यांच्या मागणीप्रमाणे व कमी दराने मत्स्यबीजांचा पुरवठा केला जातो. याचा परिणाम असा झाला की, सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ५० हजार टन असलेले भूजलाशयीन मत्स्यउत्पादन सन १९९४-९५ अखेरस जवळपास ९० हजार मे.टनापर्यंत वाढले. तथापि, राज्याच्या सागरी उत्पादनाच्या तुलनेत भूजलाशयातील मत्स्यउत्पादन अल्प असल्याचे दिसून येते. (सुमारे २५ टक्के)

२०. निमखारे पाण्यातील मत्स्यसंवर्धनासाठी जमिनीची उपलब्धता आजमावण्यासाठी राज्यात १९८० पासून सुरवात झाली असून त्या अनुषंगाने ७० लहान मोठ्या खाड्यांचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे समजते. त्यानुसार राज्यातील सुमारे १००० हेक्टर क्षेत्र निमखारे पाण्यातील मत्स्यसंवर्धनासाठी उपलब्ध होणार आहे. हे क्षेत्र उपलब्ध झाल्यानंतर मत्स्यउत्पादनात बरीच वाढ होण्याची अपेक्षा आहे.

२१. पाहणीच्या वेळी काही लाभार्थींकडून सांगण्यात आले की, योजना राबविणारे अधिकारी योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थींना भेटून त्यांच्या अडचणी समजावून घेतात, मार्गदर्शनही करतात. परंतू अडचणी लवकरात लवकर सोडवू शकत नाहीत.

# प्रकरण क्र.६

## सूचना तथा शिफारशी

१. राज्यातील मच्छिमार व्यवसायात पारंपारिक मच्छिमारांचाच जास्त समावेश असून त्यामानाने आदिवासी किंवां इतर दुर्बल घटकांतील व्यक्ती या व्यवसायात अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते. यासाठी सागरी जिल्हयात किंवा राज्याच्या इतर जिल्हयात ज्या ठिकाणी मासेमारीसाठी जलाशये उपलब्ध आहेत, अशा भागातील आदिवासी तसेच इतर दुर्बल घटकातील लोकांना मासेमारी करण्यासाठी प्रवृत्त करणे जरुरीचे आहे. असे केल्यास त्यांना उपजिविकेसाठी व्यवसाय तर मिळेलच शिवाय बेकारीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. हे साधण्यासाठी निरनिराळ्या प्रसार माध्यमातून तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत आदिवासी तरुणांमध्ये मासेमारीबद्दल आवड निर्माण करणे गरजेचे आहे. मासेमारी व्यवसायातील अनिश्चितता दूर करण्यासाठी मासेमारीतील आधुनिक तंत्रज्ञानाने उत्पादनात कशी वाढ होते, हे त्यांना दाखविणे गरजेचे आहे. जे आदिवासी मच्छिमार अर्धवेळ हा व्यवसाय करतात अशांना पूर्णवेळ मासेमारीपासून कसा फायदा होईल हे पटवून देणे महत्वाचे आहे. विशेषत: भूमीहीन व अल्पभूधारकाच्या बाबतीत हे जास्त आवश्यक आहे.

२. मत्स्यव्यवसाय करणाऱ्या लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण फारच कमी असल्याचे दिसून येते. अशिक्षित मच्छिमारांची शिक्षणाअभावी कुंचबणा अगर फसवणूक होत नसेल हे नाकारता येणार नाही. यासाठी मच्छिमारामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत विशेष प्रयत्न करणे जरुरीचे आहे. 'राष्ट्रीय साक्षरता मोहीम' या कार्यक्रमाची अंमलबजावणी मासेमारी करणाऱ्यांसाठी (विशेषत: आदिवासीसाठी) मोठ्या प्रमाणावर करणे गरजेचे आहे. शिक्षण हा 'तिसरा डोळा' असून त्यामुळे या व्यवसायातील लोकांना शासनाच्या निरनिराळ्या विकास योजनांबाबत चांगली जाण येऊन या योजनांचा जादा लाभ घेण्यास ते प्रवृत्त होऊ शकतील. शिवाय त्यांची कुंचबणा व फसवणूकही होणार नाही.

३. मच्छिमार व्यवसायातील योजनांचा लाभ घेतल्याने बऱ्याच लाभार्थ्यांचे उत्पन्न वाढून ते दारिद्रय रेषेच्यावर आल्याचे पाहणीत आढळून आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जादा मत्स्योत्पादन कसे करावे याचे मार्गदर्शन त्यांना करणे गरजेचे आहे. शिवाय त्यांनी पकडलेल्या मासळीस रास्त भावही देणे तितकेच महत्वाचे आहे. असे केल्यास मच्छिमारांचे उत्पन्न आणखी वाढण्यास मदत होईल.

४. मत्स्य व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांवर (उदा.नौका, नायलॉन जाळी, धागा, दोर, डिझेल इ.) सध्या ज्या दराने अनुदान अथवा अर्थसहाय्य देण्यात येते, त्यापेक्षा अधिक सवलतीच्या दराने दिल्यास मच्छिमारांना ती साधने घेणे अडचणीचे होणार नाही. तथापि, एकदा अनुदान अथवा

अर्थसहाय्य दिल्यानंतर किमान ठराविक कालावधीत सदरील लाभार्थीस पुन्हा त्याचा लाभ दिला जाऊ नये. अन्यथा शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचा व अर्थसहाय्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे.

५. मत्स्यव्यवसायात 'प्रशिक्षण' हे महत्वाचे आहे. अल्पकालीन प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना सध्या फक्त रु.२००/- विद्यावेतन देण्यात येते. त्यामुळे मत्स्यव्यवसाय करणारे बरेच तरुण प्रशिक्षण घेण्यास नाखूष असतात. दरमहा रु.२००/- विद्यावेतन फारच कमी असून ते किमान रु.५००/- इतके केल्यास प्रशिक्षणासाठी जादा प्रशिक्षणार्थी सहज उपलब्ध होतील. प्रशिक्षण केंद्राची निवड करतांना शक्यतो मच्छिमारांच्या गांवापासून ती फार दूर असू नयेत. तसेच मत्स्यव्यवसाय प्रशिक्षणाबरोबरच प्रशिक्षणार्थींना जाळी दुरुस्त करण्याचेही प्रशिक्षण देण्यात यावे.

६. जास्तीत जास्त आदिवासी लोकांना मत्स्यव्यवसायाकडे प्रवृत्त करुन त्यांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने आदिवासींच्या जादा मच्छिमार सहकारी संस्था स्थापन करण्याची जरुरी आहे. अशा जादा संस्था स्थापन झाल्यास आदिवासींच्या हिताचे रक्षण तर होईल, शिवाय त्यांच्या मासळीला रास्तभाव मिळेल. 'राष्ट्रीय सहकार विकास निगम' या यंत्रणेद्वारे मच्छिमार सहकारी संस्थांना मिळणारे अनुदान व अर्थसहाय्य याचा आदिवासी लोकांना मच्छिमारीसाठी निश्चितच उपयोग होईल.

७. शासकीय जलाशये लिलाव पध्दतीने मच्छिमारांना मच्छिमारीसाठी दिली जातात. अशा पध्दतीत ज्यांच्याकडून जादा पैसे दिले जातात. अशा व्यक्तींना अगर संस्थांना सार्वजानिक जलाशये मच्छिमारीसाठी उपलब्ध होतात. अशा परिस्थितीत आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या आदिवासी लोकांसाठी आदिवासी भागातील सार्वजनिक जलाशये राखून ठेवण्यात यावीत. जेणेकरुन त्यांना मच्छिमारीसाठी संधी उपलब्ध होईल व त्यांच्या उत्पन्नात भर पडेल. सार्वजानिक बांधकाम विभागाने सदर गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

८. केवळ प्रशासकीय यंत्रणेतील अडचणीमुळे मच्छिमारी करणाऱ्या लोकांना योजनांचा फायदा मिळत नसल्यास त्या अडचणी त्वरीत सोडविणे जरुरीचे आहे. उदा.पाहणीच्या वेळी तलासरी तालुक्यात पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या रिक्त पदामुळे जाळी वाटपाचे काम पूर्ण झाले नसल्याचे आढळून आले. योजना कार्यान्वित करणाऱ्या यंत्रणेने याकडे बारकाईने लक्ष देऊन लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाहीत, हे पाहणे गरजेचे आहे. कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी वरचेवर लाभार्थींना भेटून त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना त्वरीत मार्गदर्शन करणे हेही तितकेच महत्वाचे आहे.

९. शासकीय मालकीच्या जलाशयात विनापरवाना मासेमारी करणाऱ्यांवर तसेच जलाशयात विषारी औषधे टाकून मासळीचा नाश करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी महत्वाच्या व मोठ्या जलाशयांवर

पहारेकऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. म्हणजे चोरटी मासेमारी अगर मासळीचा नाश यावर आळा बसेल. तसेच मच्छिमारी जाळयांची व इतर साधनांच्या चोरीबाबत संबंधित मासेमारींनी स्वत: जागरुक असणे गरजेचे आहे.

१०. राज्याच्या एकूण उत्पन्नात मासळीपासून मिळणारे उत्पन्न महत्वाचे आहे. मासळी निर्मितीपासून परकीय चलनही मिळते. तथापि, महाराष्ट्रातील मत्स्य उत्पादन हे राष्ट्रीय मत्स्य उत्पादनाच्या सरासरीपेक्षा कमी आहे. यासाठी खोल सागरी मासेमारीत वाढ करुन तसेच गोड्या पाण्यातील मासेमारी सुधारुन मत्स्योत्पादन वाढविणे आवश्यक आहे. जागतिक बाजारपेठेतील सततच्या वाढत्या मागणीमुळे समुद्रातील 'कोळंबी' पकडण्याच्या प्रमाणात वाढ होत गेली. त्याचा परिणाम म्हणून सध्या समुद्रातील कोळंबीच्या उत्पादनात घट होत असल्याचे दिसून येते. यासाठी राज्यातील निमखाऱ्या पाण्यात कोळंबी उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने राज्यातील कोळंबी संवर्धनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे अभियांत्रिकी नकाशे व आराखडे कोळंबी संवर्धकांना लवकरात लवकर उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

११. महाराष्ट्रात सागरी भूजलाशयीन तसेच निमखारे पाणी क्षेत्रात नैसर्गिक साधनसंपत्ती लाभली असली तरी राज्यातील सर्वसामान्य जनतेला वार्षिक सरासरी १ ते ३ किलो एवढीच मासळी उपलब्ध होऊ शकते. आंतरराष्ट्रीय प्रमाणानुसार दरवर्षी दरडोई १० ते १२ किलो मासळी उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील जनतेला पुरेशी मासळी उपलब्ध करुन द्यायची असेल तर उपलब्ध जलक्षेत्रातून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जास्तीत जास्त मस्योत्पादन करणे आवश्यक आहे. यासाठी जास्तीत जास्त नौकांचे यांत्रिकीकरण करणे आवश्यक आहे. तसेच खोल पाण्यातील मासेमारीसाठी मोठ्या आकाराच्या व सुसज्ज बोटी बांधणे गरजेचे आहे.

१२. राज्यातील सागरेतर जिल्हयात भूजलाशयीन मच्छिमारी करण्यास पुष्कळ वाव आहे. राज्यात तळी, तलाव, जलाशये, यासारख्या गोड्या पाण्याचे ३ लक्ष हेक्टर इतके जलसाठे आहेत व आणखी जास्त जलसाठे निर्माण करण्यास वाव आहे. राज्यातील आदिवासी भागात पावसाचे प्रमाण बरे असून त्या भागात लहान मोठे तलाव, धरण बांधल्यास त्यात मत्स्यबीजे सोडून आदिवासींना मत्स्यशेती करण्यास प्रोत्साहीत करणे सहज शक्य आहे. राज्याने मत्स्यबीज निर्मितीच्या बाबतीत स्वयंपूर्णता गाठली असल्याने भूजलाशयात अधिकाधिक मत्स्यसंवर्धनास मोठा वाव आहे. जास्त तळी असलेल्या भंडारा जिल्हयात सध्या गोड्या पाण्यातील मच्छिमारी अधिक चालते. गोड्या पाण्यातील मत्स्यशेतीसाठी लोकांना आकर्षित करण्यासाठी मत्स्यशेतीची अधिकाधिक प्रात्यक्षिके दाखविणे तसेच मत्स्यशेती करु इच्छिणाऱ्यांना कमी दराने मत्स्यबीजांचा पुरवठा करणे गरजेचे आहे.

१३. मासळी ही नाशवंत वस्तु असल्याने ती पाण्यातून बाहेर काढल्यापासून कमीत कमी वेळेत

बाजारपेठेत पोहोचविणे आवश्यक आहे. मासळी पाण्याबाहेर काढल्यानंतर तिच्या शरिरात असलेल्या रासायनिक पदार्थाचे विघटन होण्यास सुरवात होते व सर्वसाधारणत: ५-६ तास मासळी खाण्यायोग्य स्थितीत राहते. तथापि, या कालावधीत मासळीचा ताजेपणा व टवटवीतपणा हवा तेवढा टिकून राहत नाही. त्यामुळे मासळी खराब होऊ नये व उपभोक्त्यांना ती सुस्थितीत मिळावी तसेच मच्छिमारांना तिचा योग्य मोबदला मिळावा म्हणून मासळी पाण्याबाहेर काढल्या क्षणापासून कमीत कमी वेळेत ती बर्फात जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. यासाठी मच्छिमारांना बंदरानजिकच बर्फ कारखाने किंवा शीतगृहे उपलब्ध करुन देणे जास्त आवश्यक आहे. तसेच उपलब्ध मासळी त्वरीत विकण्याच्या दृष्टीने खात्रीच्या बाजारपेठा असणे आवश्यक आहे.

१४. महाराष्ट्रात सध्या मासळी उतरविण्याची १८४ केंद्रे आहेत. या सर्व ठिकाणी उतरते धक्के किंवा मच्छिमारी बंदरे लगेच बांधणे शक्य नाही. असे असले तरी मासळी उतरविण्याच्या केंद्रात सध्या कोणत्या मूलभूत सुविधा आहेत. (उदा. मासळी वाळविण्यासाठी ओटे, जाळी दुरुस्तीसाठी निवारे, जोडरस्ते बंदरात आवश्यक मार्गदर्शक दिवे, कँटीन इ.) याचा अभ्यास होणे जरुरीचे आहे. मूलभूत सुविधा नसलेल्या ठिकाणी त्या त्वरीत उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. तसेच मासेमारी व्यवसायात स्वच्छतेची अधिक गरज असल्याने बंदरावरील स्वच्छतेकडे बंदर अधिकाऱ्याने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

१५. मच्छिमारी हा जोखमीचा व्यवसाय असून त्यात मच्छिमारांना अपघाती मृत्यु आल्यास त्याच्या वारसांना अर्थसहाय्य दिले जाते. तसेच अवर्षण, पूर, भूकंप, आग, वादळ इ. नैसर्गिक आपत्तीत सुध्दा अर्थसहाय्य दिले जाते. या अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्याची जरुरी आहे. जेणेकरुन अधिक लोक मच्छिमारी करण्यासाठी पुढे येतील.

१६. महाराष्ट्र राज्यातील मत्स्यउत्पादन राष्ट्रीय मत्स्योत्पादनाच्या सरासरीच्या मानाने कमी आहे. मत्स्यव्यवसायातील इतर राज्यांची प्रगती जाणून घेण्याच्या दृष्टीने व मत्स्य व्यवसायातील कसब आत्मसात करण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय करणाऱ्या आंतरराज्यीय अभ्यास सहली संबंधित खात्यामार्फत आयोजित करणे महत्वाचे आहे. असे केल्याने मच्छिमारांना इतर राज्यातील या व्यवसायातील प्रगती व कौशल्य पाहण्याची संधी प्राप्त होऊन अधिक मत्स्योत्पादनास चालना मिळेल.

१७. मासळीचे दर हेक्टरी उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने माशांच्या नवीन जातींचे संशोधन करणे गरजेचे आहे. तसेच माशांची वाढ लवकर होण्याच्या दृष्टीने मत्स्यशेती करणाऱ्यांना मत्स्य खते/खाद्य रास्त दराने देण्यात यावीत. मत्स्यशेती करणाऱ्यांना व मासेमारांना त्यांनी उत्पादित केलेल्या व पकडलेल्या मासळीची योग्य किंमत मिळण्याच्या दृष्टीने लोकांना मासळीचे आहारातील महत्व पटवून देणे हेही तितकेच महत्वाचे आहे. असे झाल्यास मासळीचा खप वाढून मत्स्य उत्पादकांना त्याचा योग्य मोबदला मिळेल. शिवाय

मासळीपासून निरनिराळे पदार्थ, औषधे, रसायने इत्यादी बनविण्यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे.

१८. मासेमारी करणाऱ्या प्राथमिक संस्थांची आर्थिक परिस्थिती व त्यांना मिळणारे मत्स्योत्पादन हे बहुतांशी व्यस्त प्रमाणात असते. यासाठी अशा मच्छिमारी सहकारी संस्थांची परिस्थिती सुधारण्यासाठी या संस्थांना शासनामार्फत भरीव अर्थसहाय्य मिळणे आवश्यक आहे. ही मदत सहकारी संस्थांना वाढत्या भांडवलाच्या रुपाने देणे सोयीचे होईल. सध्या शासनाकडून अशा संस्थांना १/३ प्रमाणात भाग भांडवल मंजूर करण्यात येते. हे प्रमाण फार जुने व कमी असल्याने शासनामार्फत देण्यात येणाऱ्या भागभांडवलाची मर्यादा वाढविणे जरुरीचे वाटते.

१९. सध्या राज्यात तीन प्रकारच्या मच्छिमारी संस्था अस्तित्वात आहेत. (अ) राज्यस्तरीय शिखर संघ (ब) जिल्हास्तरीय संघ (क) प्राथमिक सहकारी संस्था. प्रत्येक सहकारी संघाचे अधिकार व जबाबदाऱ्या एकमेकांच्या अधिकारांवर अतिक्रमण करणारे असून सर्वांचे कार्य सारखेच असल्यामुळे प्रत्येकाचे कार्य सुरळीतपणे पार पडत नाही. यासाठी त्रिस्तरीय सहकारी संस्थामध्ये सामंजस्याचे व सदभावनेचे नाते असले पाहिजे.यासाठी मच्छिमारी सहकारी संस्थांच्या नियमात बदल करणे आवश्यकआहे.

२०. मत्स्यव्यवसाय अंतर्गत असलेल्या योजनांपैकी वैयक्तिक लाभाच्या योजना कमी असल्याने त्यात वाढ करण्यात यावी.

२१. मत्स्यव्यवसाय या क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना किंवा विक्रमी मत्स्योत्पादन करणाऱ्या सहकारी संस्थांना शासनातर्फे बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात यावा. असे केल्याने मत्स्यव्यवसाय क्षेत्रात चांगले काम करणाऱ्यात तसेच मत्स्योत्पादन करणाऱ्या संस्थांत स्पर्धा निर्माण होऊन त्यांच्याकडून मत्स्यव्यवसाय विकासाला मोठा हातभार लागेल.

२२. थोडक्यात मत्स्यव्यवसाय विभागाच्या विविध योजनांचा चांगल्या अंमलबजावणीसाठी खालील गोष्टी विचारात घेणे गरजेचे आहे.

(अ) मत्स्यसंवर्धनाच्या पध्दतीमध्ये सुधारणा करणे
(ब) मत्स्यसंवर्धनासाठी जादा क्षेत्र उपयोगात आणणे
(क) गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनात अधिक वाढ करणे
(ड) मत्स्य बीजांची तसेच मत्स्यबीज निर्मिती केंद्राची गरज आजमावणे
(इ) मासळीच्या विक्री पध्दतीमध्ये विस्तार करणे
(ई) व्यवस्थापन अद्यावत करणे इ.

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

मत्स्य व्यवसाय योजनेतर्गत योजनांचे मूल्यमापन करणे.

सन १९९२-९३ व ९३-९४

---

### प्रपत्र - ३ लाभार्थ्यासाठी प्रश्नावली

### चौक क्र. १ प्रास्ताविक माहिती.

१] लाभार्थ्याचे संपूर्ण नांव :

वाडी/पाडा गांव

तालुका जिल्हा

२] लाभार्थ्याचे वय :

३] आदिवासी जमातीचे नांव :

४] लाभार्थ्याची शैक्षणिक पात्रता :

५] लाभार्थ्याचा व्यवसाय - मुख्य :

दुय्यम :

६] कुटुंबातील व्यक्तींची संख्या : पुरुष स्त्रिया

मुले एकूण

---

### चौक. २ शेतिविषयक

१] लाभार्थ्याकडे असलेली जमीन : एकर गुंठे एकूण

[एकरात]

१] बागायत

२] जिरायत

३] पडिक

४] एकूण

२] शेतीपासूनचे वार्षिक उत्पन्न :
[रूपयांत]

३] शेती व्यतिरिक्त अन्य मार्गाचे :
वार्षिक उत्पन्न [उदा. मजुरी/
व्यवसाय]

[illegible] :

४] या योजनेचा लाभ घेण्यापूर्वी आपण स्वत: मत्स्यव्यवसाय करीत होता का ? : होय / नाही.

५] होय असल्यास, योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी या व्यवसायाव्दारे वार्षिक किती उत्पन्न मिळत होते ?[रुपयात] :

६] योजनेमुळे वार्षिक उत्पन्नात किती रुपयांनी वाढ झाली ? :

---

चौक क्र.-३ योजने विषयी

१] मत्स्यव्यवसाय योजनेतर्गत नेमक्या कोणत्या योजनेचा लाभ मिळाला ? :

| अ.क्र. | योजनेचे नांव | विभागाचे नांव |
|---|---|---|
| १] | | |
| २] | | |
| ३] | | |

२] योजनेचे थोडक्यात स्वरूप व माहिती :

३] या योजनेचा लाभ मिळण्याचे वर्ष :

४] या योजनेखाली किती रक्कम मिळाली. :

अ] वैयक्तिक रित्या मिळाली का: गटाला मिळाली

५] या योजनेचा लाभ घेण्यापूर्वी तुमच्याकडे मत्स्यव्यवसायाची साधने होती का ? : होय / नाही

६] या योजनेचा फायदा घेतल्यामुळे तुमच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाली का ? : होय / नाही

७] वाढ झाली असल्यास किती [रुपयात] :

८] वाढ झाली नसल्यास त्याची कारणे कोणती ? : १] ..............................
२] ..............................
३] ..............................

९] ही योजना मिळविण्यासाठी कोणत्या शासकीय कार्यालयाची मदत घ्यावी लागली. : १] प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२] संचालक मत्स्य व्यवसाय कार्यालय
३] गट विकास अधिकारी कार्यालय
४] सहकार खाते
५] इतर.

१०] वरील कार्यालयाकडून नेमकी कोणती मदत मिळाली :

११] ह्या योजनांपासून तुम्हाला फायदा झाला असे वाटते का ? : होय / नाही

१२] फायदा झाला नसल्यास त्याची कारणे कोणती ? : १] ..............................
२] ..............................
३] ..............................

१३] या योजनेबाबत अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन/तांत्रिक सल्ला मिळाला का ? : होय / नाही

१४] असल्यास कोणता सल्ला / मार्गदर्शन मिळाले :

१५] मार्गदर्शन/तांत्रिक सल्याचा तुम्हाला उपयोग झाला का ? होत असल्यास कशा प्रकारे ? : होय / नाही

१६] नसल्यास त्याची कारणे कोणती ? : १] ..............................
२] ..............................
३] ..............................

१७] मत्स्यव्यवसायासाठी तुमचा स्वतःचा आर्थिक सहभाग होता का : होय / नाही.

चौक क्र. ४

१] या योजनेचा तुम्हाला लाभ मिळाल्यानंतर : होय / नाही
संबंधित अधिका-यांकडून त्याची पहाणी
करण्यात आली का ?

२] पहाणीचे वेळी अधिका-यांनी काही : होय / नाही
सूचना दिल्यात.का ?

३] त्या सूचनांचे तुम्ही पालन केले काय ? :

४] सदर सूचनेनुसार तुम्ही कोणते बदल केलेत :

५] या योजनेबाबत काही अन्य अडचणी : होय / नाही
आहेत काय ?

६] असल्यास कोणत्या ? : १] ..............................
२] ..............................
३] ..............................

७] संबंधित अधिका-यांच्या भेटीच्या वेळी :
त्या अडचणी तुम्ही त्यांना
सांगितल्यात काय ?

८] संबंधित अधिका-यांनी अडचणी सोडविण्या-:
बाबत काही कार्यवाही केली काय ? होय / नाही
केली असल्यास कार्य कार्यवाही केली

९] लाभ घेतलेली ही योजना अधिक : होय / नाही
चांगली होण्याच्या दृष्टीने त्यात काही
सुधारणा बदल करावेसे तुम्हास वाटतात का?

१०]होय असल्यास कोणते बदल व्हावेत :
असे वाटते.

११]या बदलामुळे मत्स्यभार आदिवासी :
लाभार्थ्यांचे कशाप्रकारे फायदे होतील
असे तुम्हास वाटते

दिनांक :
ठिकाण :

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे १

मत्स्यव्यवसाय योजनेंतर्गत योजनांचे मुल्यमापन करणे. सन १९९२-९३ व ९३-९४

प्रपत्र क्र.२ : कार्यान्वय अधिकारी यांचेसाठी प्रश्नावली.

### भाग क्र.१ प्रास्ताविक माहिती

१] कार्यालयाचे नांव व पत्ता :

२] अधिकाऱ्याचे नांव :

३] हुद्दा / पद

४] किती वर्षांपासून आपण आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करत आहात :

५] कोणत्या पातळीवर : ग्राम / तालुका / जिल्हा / राज्य

५] अ] मत्स्य व्यवसाय योजने अंतर्गत कोणकोणते लाभ योजना दिले जातात ? : १] ..................................
२] ..................................
३] ..................................

ब] सदर योजना अनुदान तत्वावर की, कर्ज स्वरुपात ? : ..................................

६] मोठ्या स्वरुपातील लाभाचा विमा उतरविला जातो का ? कर्ज परतफेड : होय / नाही

७] लाभधारकांना कर्ज पासबुक दिले जाते का ? : होय / नाही

८] हप्त्यांची संख्या मापाई निकष प्रमाणे ठरविली जाते का ? : होय / नाही

९] लाभधारक क्वचित थकबाकीदार राहतात का ? : होय / नाही

१०] थकबाकीदार रहात असल्यास त्याची कारणे : १] ..................................
२] ..................................
३] ..................................

११] लाभ मिळूनही लाभधारकां-: १]..............................
च्या उत्पन्नात वाढ न
होण्याची कारणे काय ?
२] ..............................
३] ..............................

१२] मत्स्य व्यवसाय अंतर्गत : होय / नाही
योजनांचा लाभ दिल्या-
नंतर लाभार्थ्यांच्या
उत्पन्नात वाढ होते का ?

१३] लाभ दिल्यानंतर आपण : होय / नाही
लाभार्थ्यांच्या घरी जाऊन
दिलेल्या लाभाची पाहणी
करता काय ?

साधारण किती टक्के : संख्या / टक्केवारी
लाभार्थ्यांची पहाणी करता

अ] त्या संदर्भात लाभार्थी-: होय / नाही
ना मार्गदर्शन/सूचना
देता काय ?

ब] लाभधारकाकडून अर्ज :
मिळाल्यापासून त्यांना
लाभ मिळण्यासाठी
किती दिवस लागतात ?

क] लाभधारकांना लाभ : १] ..............................
मिळण्यास उशीर होत
असल्यास कारणे
कोणती ?
२] ..............................
३] ..............................

१३] मत्स्य व्यवसाय योजनांमुळे : होय / नाही
आदिवासींच्या कौटुंबिक
परिस्थितीत काही बदल
झाला काय ?

१४] आपण राबवित असलेल्या : १] ..............................
कोणत्या योजनांना
आदिवासीकडून जास्त
प्रतिसाद मिळतो ?
२] ..............................
३] ..............................

१५] जास्त प्रतिसाद मिळण्याची : १] ..............................
कारणे
२] ..............................
३] ..............................

१५] कोणत्या योजनांना यांपैकी प्रतिसाद मिळत नाही. : १].................................
२] .................................
३] .................................

१६] त्याची कारणे कोणती ? : १] .................................
२] .................................
३] .................................

१६] मत्स्य विक्रीची [मार्केटिंगची ] काय व्यवस्था आहे. :

१७] लाभार्थींनी पकडलेल्या माशांच्या विक्रीसाठी शासनामार्फत कोणती व्यवस्था करण्यात येते :

१८] मत्स्य व्यवसाय योजनेतर्गत : आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सहकारी संस्थाची सभासदांसह संख्या विशद करा.

१९] मत्स्यव्यवसाय [illegible] : योजना आदिवासींना अधिक उपयुक्त होण्यासाठी योजनेत काय बदल करावेत असे आपणास वाटते ?

२०] आदिवासी उपयोजना : क्षेत्रात विविध योजना अधिक यशस्वी होण्याच्या दृष्टीने आदिवासींचा सहभाग अधिक कसा मिळवता येईल ?

२१] विशेष सूचना :

ठिकाण
दिनांक :

कार्यान्वयन अधिकाऱ्याची स्वाक्षरी

## मत्स्यव्यवसाय योजनेतर्गत योजनाचे मुल्यमापन करणे.

## सहकारी संस्थेसाठी प्रश्नावली.

---

१] सहकारी संस्थेचे नांव व पत्ता :

२] योजना मिळाल्याचे आर्थिक वर्ष :

३] योजनेसाठी मंजूर तरतूद व झालेला खर्च :

४] योजना राबविण्याचे ठिकाण :

५] लाभार्थ्यांची संख्या :

६] सह. संस्थेचा इतर तपशिल :

७] सदर संस्था रजिष्टर केली आहे काय ? असल्यास रजिष्टर नं. :

८] रजिस्टर्ड नसल्यास का नाही :

९] संस्थेच्या कार्यकारी मंडळाची विषयी माहिती :

१०]संस्थेचे एकूण सभासद :

११]सभासद कोणत्या जमातीचे आहेत. :

१२]संस्थेचा आर्थिक व्यवहार कोण हाताळतो ? :

१३]संस्थेस सभासदांचा आर्थिक / शारीरीक सहभाग आहे का ? असल्यास किती व कसा ? : होय / नाही

अ] मागील दोन वर्षात संस्थेस कोणकोणत्या योजनांचा लाभ झाला. :

१४]सदर योजना कायम स्वरूपी आहे का काही कालवधीसाठी आहे ? :

१५] सभासदात एकमेकात सहकार्याची भावना आहे काय ? : होय / नाही

१६] या योजने संदर्भात संबंधित अधिकारी पाहणी करण्यासाठी येतात का ? : होय / नाही

१७] त्यांचे याबाबतीत काही मार्गदर्शन मिळते आहे का ? असल्यास कोणते ? : होय / नाही

१८] या योजनेपूर्वी सभासद मत्स्य व्यवसाय करीत होते का ? : होय / नाही

१९] या योजनेमुळे लाभधारकांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाली असे आपणास वाटते का ? असल्यास किती रुपयांनी वाढ झाली. वाढ झाली नसल्यास त्याची कारणे कोणतीही ? : होय / नाही

: १]

२]

३]

२०] ही योजना चांगलीराबविण्या-च्या दृष्टीने काय करावे असे आपणास वाटते ? अभिप्राय :

२१] सदर योजना लाभदायी ठरली असे आपणास वाटते का ? : होय / नाही

२२] नसल्यास त्याची कारणे : १]

२]

३]

२३] या योजनेत काही उणीवा आहेत असे वाटते का ? :

२४] असल्यास कोणत्या : : १]

२]

३]

दिनांक::

सही
अध्यक्ष / उपाध्यक्ष
मत्स्यमार सहकारी सोसायटी